- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,५८,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,५६,३५० /-
✔ चांदी : २,७८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : बुधवार, १८ नोव्हेंबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३३८ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

बाळासाहेबांचा वारसा आम्ही पुढे नेत आहोत : एकनाथ शिंदे



वृत्तसंस्था, मुंबई

बाळासाहेबांनी दिलेला हिंदुत्वाचा विचार आणि ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हा मूलमंत्र शिवसेना आजही तितक्याच निष्ठेने आणि ताकदीने जपत आहे. बाळासाहेबांच्या विचारांवर चालणारे सरकार सर्वसामान्यांच्या हिताला प्राधान्य देत असून, समाजकारणाच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न सोडविण्याचे काम करीत आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी रिगल सिनेमासमोरील शिवसेनाप्रमुखांच्या पुतळ्याला अभिवादन केले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना शिंदे यांनी बाळासाहेबांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी शिवसेनेचे वरिष्ठ नेते, उपनेते, मंत्री, खासदार, आमदार तसेच प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यकर्ता हा घरात बसण्यासाठी नव्हे, तर जनतेच्या सेवेसाठी मैदानात उतरला पाहिजे, ही बाळासाहेबांची शिकवण होती.त्याच विचारातून दुष्काळग्रस्त भागातील शिवसैनिक शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेत असून, संकटात त्यांना मदतीचा हात देत आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

जिथे संकट, तिथे शिवसेना आणि जिथे आपत्ती, तिथे शिवसेना हा बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांनी दिलेला सेवाभावाचा मंत्र प्रत्यक्षात उतरविण्याचे काम सुरू आहे. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शिवसेनेचे आमदार, खासदार, मंत्री, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सक्रिय राहावे, अशा सूचना देण्यात आल्याचेही शिंदे यांनी सांगितले.

शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाऊ देणार नाही, असा शब्द सरकारने दिला होता. त्यानुसार तातडीची पाच हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली असून, शिवसेनेच्या वतीनेही शेतकऱ्यांना दिवाळी मदत पोहोचविण्यात आली आहे. शेतक-यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी सरकार यापुढेही सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

विरोधकांनी मदतीच्या मुद्द्यावर राजकारण करू नये

राज्यात शेतकऱ्यांच्या मागणीनुसार दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, मंत्रिमंडळातील सदस्यांनी प्रत्यक्ष बांधावर जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला आहे. दुष्काळग्रस्तांना १२ प्रकारच्या सवलतींसह नुकसानभरपाईचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे अग्रिम मदतीच्या मुद्द्यावरून विरोधकांनी राजकारण करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढे यावे. हा आरोप-प्रत्यारोपांचा नव्हे, तर संकटग्रस्त शेतकऱ्यांना आधार देण्याचा काळ आहे असे आवाहनही शिंदे यांनी केले.

दुष्काळाची व्याप्ती वाढली

वृत्तसंस्था, मुंबई

राज्यातील दुष्काळाचे संकट दिवसेंदिवस गडद होत असून राज्य सरकारने मंगळवारी आणखी चार तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित केला. त्यामुळे दुष्काळी तालुक्यांची संख्या आता ३०४ वरून ३०८ वर पोहचली आहे. याशिवाय आणखी ९ तालुक्यांचे ग्राऊंड सर्वेक्षण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे दुष्काळी तालुक्यांच्या संख्येत वाढ होणार आहे.

महसूलमंत्री तथा दुष्काळी उपाययोजनांच्या संदर्भात गठीत करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठक पार पडली. या बैठकीत पाणीटंचाई निवारण, जलजीवन मिशनची अपूर्ण कामे आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा झाली. दुष्काळी परिस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करून आवश्यक उपाययोजनांना गती देण्यासाठी पालक सचिवांनी अधिवेशनापूर्वी राज्यातील सर्व जिल्ह्यांना भेट देऊन दुष्काळाच्या सर्व निकषांनुसार परिस्थितीचा सविस्तर आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल मुख्य सचिवांकडे सादर करावा, असे निर्देश बावनकुळे यांनी बैठकीत दिले.

पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर करण्यात येणाऱ्या दहा उपाययोजनांबाबत येत्या एक-दोन दिवसांत शासन निर्णय जारी करण्यात येणार आहे. जलजीवन मिशनअंतर्गत योजना पूर्ण झाल्यास ज्या गावांमध्ये टँकरची आवश्यकता भासणार नाही अशा १३ तालुक्यांतील २१२ योजनांच्या कामांसाठी वित्त विभागाने ८३.१८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. तसेच रेट्रोफिटिंगसाठी ४०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. पाणीटंचाईच्या कामांसाठी यापूर्वीची ३४९ कोटी रुपयांची थकबाकी पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध होणार असून हा निधी डिसेंबर अखेरपर्यंत मिळेल.

थोडक्यात

महेंद्रसिंग धोनीचा आयपीएलला अलविदा



मुंबई : चेन्नई सुपर किंग्सला आपल्या नेतृत्वात तब्बल ५ वेळा आयपीएल ट्रॉफी जिंकून देणाऱ्या महेंद्रसिंग धोनीने २० व्या मोसमाआधी तडकाफडकी निवृत्ती जाहीर केली. क्रिकेट चाहत्यांना मंगळवारी १७ नोव्हेंबरला रिटेन आणि रिलीज होणाऱ्या खेळाडूंच्या नावाची प्रतीक्षा होती. मात्र, चेन्नई सुपर किंग्सने धोनी आयपीएलमधून निवृत्त होत असल्याचे जाहीर केले. धोनीच्या निवृत्तीमुळे एका सुवर्ण युगाचा शेवट झाल्याच्या प्रतिक्रिया सोशल मीडियावर पाहायला मिळत आहेत. धोनीने एक कर्णधार, फलंदाज आणि विकेटकीपर या तिन्ही भूमिकांमध्ये सर्वोत्तम कामगिरी केली. धोनी आता सीएसकेचा मेंटॉर असणार आहे. या निमित्ताने धोनीने त्याच्या आयपीएल कारकिर्दीत मोठे ऐतिहासिक विक्रम नोंदविले आहेत. धोनी आयपीएलमध्ये कर्णधार म्हणून सर्वाधिक सामने खेळणारा खेळाडू आहे. धोनीने आयपीएल कारकिर्दीत २७८ सामने खेळले.

धापेवाड्यात ट्रकच्या धडकेत बैलबंडीचा भीषण अपघात, गंभीर जखमी महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू

महालक्ष्मी जिनिंगजवळ घटना; पती गंभीर जखमी, नागपूरला हलविले



दै. सिंहवाणी वृत्त, धापेवाडा

सावनेर तालुक्यातील धापेवाडा येथे महालक्ष्मी जिनिंगजवळ १७ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास ट्रकने बैलबंडीला मागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात बैलबंडीवरील प्रभाकर कापसे (वय ५५) आणि त्यांच्या पत्नी पुष्पा प्रभाकर कापसे (वय ५०, रा. धापेवाडा) गंभीर जखमी झाले. दोन्ही जखमींना १०८ रुग्णवाहिकेद्वारे धापेवाडा येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांची गंभीर प्रकृती लक्षात घेता पुढील उपचारासाठी नागपूर येथे रेफर करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान पुष्पा प्रभाकर कापसे यांचा मृत्यू झाल्याची माहिती पुढे आली आहे.

या अपघातात सहभागी ट्रकचा क्रमांक NL 01 AD 6980 असा असून, अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघातात बैलालाही दुखापत झाली.

अपघाताची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांनी तातडीने सावनेरचे उपविभागीय पोलीस अधिकारी (रउढड) सागर खर्डे तसेच महागार्म पोलिसांना माहिती दिली. हितज्योती आधार फाउंडेशनचे टीम मेंबर कृणाल कावळे यांनी १०८ रुग्णवाहिकेला पाचारण करून जखमींना तातडीने मदत मिळवून दिली.

६३ फायनान्स कंपन्यांचे परवाने रद्द

वृत्तसंस्था, मुंबई

भारतीय रिझर्व्ह बँकेने देशातील फायनान्स क्षेत्रात मोठी कारवाई करत एका झटक्यात तब्बल ६३ फायनान्स कंपन्यांचे परवाने रद्द केले. १६ नोव्हेंबर रोजी जारी केलेल्या अधिकृत अधिसूचनेद्वारे आरबीआयने ही माहिती दिली. या कारवाईअंतर्गत ४९ नॉन-बँकिंग फायनान्स कंपन्यांचे परवाने रद्द करण्यात आले असून, हे आदेश १ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर दरम्यान पारित करण्यात आले. याशिवाय १३ एनबीएफसी आणि १ हाऊसिंग फायनान्स कंपनीने स्वतःहून आपले रजिस्ट्रेशन परत केले. आरबीआय अधिनियम १९३४ च्या तरतुदींनुसार ही कारवाई करण्यात आली. रिझर्व्ह बँकेने दिलेल्या माहितीनुसार नियमांचे पालन न करणे, विहित अटी पूर्ण न करणे आणि व्यवसाय बंद होणे या कारणांमुळे ही कारवाई केली जाते.

एकूण १४ कंपन्यांनी वेगवेगळ्या कारणांमुळे आपले रजिस्ट्रेशन परत केले. यापैकी ६ कंपन्यांनी एनबीएफसीचा व्यवसाय बंद केला होता, ५ कंपन्यांना आता रजिस्ट्रेशनची आवश्यकता उरली नव्हती तर ३ कंपन्यांचे विलीनीकरण झाल्यामुळे किंवा त्या बंद पडल्यामुळे त्यांचे परवाने रद्द झाले. आरबीआयने स्पष्ट केले की, ज्या कंपन्यांचे रजिस्ट्रेशन रद्द झाले, त्या यापुढे एनबीएफसी म्हणून कोणताही व्यवसाय करू शकणार नाहीत. म्हणजेच त्यांना कर्ज देणे किंवा फायनान्सशी संबंधित कोणतेही व्यवहार करता येणार नाहीत.

परवाने रद्द करण्यात आलेल्या कंपन्यांमध्ये मणिभवनाम होम फायनान्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, सन सोर्स लीफिन प्रायव्हेट लिमिटेड, लियानर डिस्ट्रीब्यूटर्स प्रायव्हेट लिमिटेड आदींचा समावेश आहे. तसेच अमर प्लाझा अँड होल्डिंग्ज प्रायव्हेट लिमिटेड, विकोनिक व्यापार प्रायव्हेट लिमिटेड, सीजीआर मर्कंटाइल फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्यासह अनेक कंपन्यांचा समावेश आहे.

नागपूर वैध मापनशास्त्र विभागात कार्यकारी मानकांचा वापर का टाळला जातो?

शासनाने निरीक्षकांना दिलेली वर्किंग स्टँडर्ड उपलब्ध असतानाही परवानाधारकांवर कमर्शियल वजनांची सक्ती; नियमांच्या अंमलबजावणीवर गंभीर प्रश्नचिन्ह!

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र शासनाच्या वैध मापनशास्त्र विभागाचे नियंत्रक, वैध मापनशास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत राज्यातील प्रत्येक विभागातील निरीक्षकांना वजन-मापांची पडताळणी व मुद्रांकन करण्यासाठी अधिकृत कार्यकारी मानके उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. या मानकांचा वापर करूनच वजन-मापांची पडताळणी व मुद्रांकन करण्याची व्यवस्था असताना नागपूर विभागात मात्र या कार्यकारी मानकांच्या वापराबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

शासनाने प्रत्येक निरीक्षकाला कार्यकारी मानके उपलब्ध करून दिलेली असताना त्यांचा प्रत्यक्ष वापर का केला जात नाही? परवानाधारकांना पडताळणी व मुद्रांकनासाठी स्वतःची कमर्शियल वजने उपलब्ध करून देण्यास का भाग पाडले जाते? तसेच वजनकाट्याच्या क्षमतेच्या निम्म्या क्षमतेइतकी वजने आणण्याची सक्ती कोणत्या कायदेशीर तरतुदीनुसार केली जाते? असे अनेक प्रश्न आता नागपूर विभागातील परवानाधारक, वजन-माप व्यावसायिक आणि विविध संघटनांकडून उपस्थित केले जात आहेत.

शासनाची कार्यकारी मानके असताना कमर्शियल वजनांची सक्ती कशासाठी?

वैध मापनशास्त्र विभागातील निरीक्षकांना शासनाकडून देण्यात आलेली कार्यकारी मानके ही पडताळणी व मुद्रांकन प्रक्रियेसाठी उपलब्ध असलेली अधिकृत साधने आहेत. त्यांचा वापर करून संबंधित वजन-मापांची अचूकता तपासणे आणि निर्धारित कायदेशीर निकषांनुसार पडताळणी करणे अपेक्षित आहे.



मात्र, नागपूर विभागातील काही निरीक्षकांकडून उपलब्ध कार्यकारी मानकांचा अपेक्षित वापर न करता परवानाधारकांना स्वतःची कमर्शियल वजने आणण्यास सांगितले जात असल्याचा आरोप परवानाधारकांकडून करण्यात येत आहे. एवढेच नव्हे तर काही प्रकरणांमध्ये वजनकाट्याच्या क्षमतेच्या निम्म्या क्षमतेइतकी वजने उपलब्ध करून देण्याची सक्ती केली जात असल्याचेही सांगण्यात येत आहे. शासनाने निरीक्षकांना अधिकृत कार्यकारी मानके उपलब्ध करून दिलेली असताना त्यांचा वापर न करता परवानाधारकांवर अतिरिक्त जबाबदारी टाकण्यामागील नेमके कारण काय, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

वन थर्ड एररचा निकष आणि पडताळणी प्रक्रियेतील संभ्रम

वजन-मापांच्या पडताळणी प्रक्रियेत त्रुटीची मर्यादा हा अत्यंत महत्त्वाचा तांत्रिक मुद्दा आहे. परवानाधारकांच्या म्हणण्यानुसार, कार्यकारी मानकांची अचूकता आणि कमर्शियल वजनांची अचूकता यामध्ये महत्त्वाचा फरक असतो. त्यांच्या मते, कार्यकारी मानकांमध्ये अपेक्षित अचूकता राखली जाणे आवश्यक असते, तर कमर्शियल वजनांमध्ये त्रुटीची शक्यता तुलनेने अधिक असू शकते. त्यामुळे पडताळणीसाठी योग्य दर्जाची व निर्धारित अचूकतेची मानके वापरणे आवश्यक आहे.

वासंदर्भात वन थर्ड (१/३) एररचा निकष नेमका कोणत्या परिस्थितीत आणि कोणत्या तांत्रिक तरतुदीनुसार लागू होतो, याबाबत विभागाने स्पष्ट लेखी भूमिका मांडण्याची गरज आहे. केवळ कमर्शियल वजनांच्या उपलब्धतेवर अवलंबून राहून पडताळणीची प्रक्रिया राबविणे योग्य आहे का, याचीही तांत्रिक तपासणी होणे आवश्यक आहे.

शासनाच्या आदेशांची अंमलबजावणी होते की केवळ कागदावरच?

नागपूर विभागातील या प्रकाराबाबत यापूर्वीही शासन आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास बाबी आणून दिल्याचे परवानाधारकांचे म्हणणे आहे. मात्र, त्यानंतरही संबंधित पद्धतीत बदल झालेला नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

शासनाने निरीक्षकांना कार्यकारी मानके दिली असताना त्यांचा वापर न करण्यामागे प्रशासकीय कारण आहे की अन्य काही कारणे आहेत, याची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. तसेच या प्रक्रियेमुळे परवानाधारकांना आर्थिक, व्यावसायिक आणि प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत.

सर्व संघटना आणि परवानाधारकांची कारवाईची मागणी

या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर चौकशी करून संबंधित निरीक्षकांच्या कामकाजाची तपासणी करण्यात यावी, अशी मागणी विविध संघटना, परवानाधारक आणि संबंधित व्यावसायिकांकडून होत आहे. प्रत्येक निरीक्षकाला देण्यात आलेल्या कार्यकारी मानकांची उपलब्धता, त्यांची वैधता, अचूकता, कॅलिब्रेशनची स्थिती आणि प्रत्यक्ष वापर यांची तपासणी करावी. तसेच परवानाधारकांना कमर्शियल वजनांची सक्ती कोणत्या लेखी आदेशानुसार तसेच कायद्यानुसार केली जाते, याचा खुलासा करावा.

जर चौकशीत नियमबाह्य पद्धतीने कामकाज करणे, अधिकारांचा गैरवापर करणे किंवा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे पुराव्यांनिशी सिद्ध झाले, तर संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर नियमानुसार कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. गंभीर दोष सिद्ध झाल्यास निलंबनाची कारवाई करण्याचीही मागणी करण्यात येत आहे.

आता नियंत्रक आणि वरिष्ठ प्रशासन काय भूमिका घेणार?

वैध मापनशास्त्र विभाग हा व्यापारी व्यवहारातील पारदर्शकता, ग्राहकांचे हित आणि वजन-मापांची अचूकता जपणारा महत्त्वाचा शासकीय विभाग आहे. अशा विभागातील पडताळणी प्रक्रिया नियमबद्ध, पारदर्शक आणि तांत्रिकदृष्ट्या अचूक असणे अत्यावश्यक आहे. शासनाने स्वतः उपलब्ध करून दिलेल्या कार्यकारी मानकांचा वापर प्रत्यक्षात होत नसेल, तर त्या मानकांचा उपयोग नेमका कशासाठी केला जात आहे, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

आता महाराष्ट्र राज्याचे नियंत्रक, वैध मापनशास्त्र विभाग तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी नागपूर विभागातील या तक्रारींची दखल घेऊन चौकशीचे आदेश देतात का? संबंधित निरीक्षकांना कार्यकारी मानकांचा नियमानुसार वापर करण्याबाबत स्पष्ट निर्देश देतात का? आणि दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करतात का, याकडे संपूर्ण नागपूर विभागातील परवानाधारक, व्यावसायिक आणि संघटनांचे लक्ष लागले आहे.

संपादकीय लेखणीतून...

बालकांवरील लैंगिक अत्याचार : आजची गंभीर समस्या

या दिवसाचे उद्दिष्ट म्हणजे बालकांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याचे संरक्षण करणे, त्यांना सुरक्षित आणि आदरपूर्वक वागणूक मिळावी यासाठी जागरूकता निर्माण करणे होय. आजच्या समाजात बालकांवरील लैंगिक अत्याचार, शोषण आणि हिंसा ही गंभीर समस्या बनली आहे, ती शिगेला पोचली आहे. जी त्यांच्या भावनिक आणि मानसिक विकासावर दीर्घकालीन परिणाम करते. आज बाल लैंगिक अत्याचार निषेध दिवशी विविध संस्था आणि सामाजिक संघटना कार्यशाळा, जनजागृती कार्यक्रम, आणि चर्चासत्रांचे आयोजन करतात. या उपक्रमांमधून पालक, शिक्षक आणि समाजातील सर्व घटकांना बालकांच्या हक्काविषयी माहिती दिली जाते आणि अत्याचाराचे संभाव्य संकेत ओळखण्याचे महत्त्व अधोरेखित केले जाते. हा दिवस बालकांना सुरक्षित वातावरणात वाढवण्याची प्रेरणा देतो, तसेच बाल अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी आणि त्यांच्यावर परिणाम होऊ नये म्हणून सर्वांनी एकत्र येण्याची गरज अधोरेखित करतो. दरवर्षी १८ नोव्हेंबर रोजी जगभरात बाल लैंगिक शोषण आणि अत्याचार प्रतिबंध व निवारण दिन - World Day for the Prevention of and Healing from Child Sexual Exploitation, Abuse and Violence पाळला जातो. संयुक्त राष्ट्र महासभेने लहान मुलांचे लैंगिक शोषणापासून संरक्षण करणे आणि पीडित मुलांच्या पुनर्वसनाबाबत जनजागृती करणे या उद्देशाने हा दिवस घोषित केला आहे.

जागतिक जनजागृती. जगभरातील लहान मुलांवर होणारे ऑनलाइन आणि ऑफलाइन लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी हा दिवस महत्त्वाची भूमिका बजावतो. संयुक्त राष्ट्रांचा पुढाकार. संयुक्त राष्ट्र महासभेने नोव्हेंबर २०२२ मध्ये ठराव मंजूर करून १८ नोव्हेंबर हा दिवस अधिकृतरीत्या पाळण्यास सुरुवात केली. मौन सोडण्याचे आवाहन. बाल लैंगिक अत्याचाराच्या घटनांवर पांघरूण न घालता त्याविरोधात उघडपणे बोलणे आणि दोषींना शिक्षा मिळवून देणे हा या दिवसाचा मुख्य संदेश आहे.

पोक्सो कायदा २०१२ : भारतात लहान मुलांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण करण्यासाठी पोक्सो कायदा लागू करण्यात आला आहे. १८ वर्षाखालील प्रत्येक व्यक्तीला या कायद्यांतर्गत "बालक" मानले जाते. लिंगनिरपेक्ष संरक्षणः हा कायदा मुलगा आणि मुलगी असा कोणताही भेदभाव न करता दोघांनाही समान संरक्षण देतो. जलदगती न्यायप्रक्रियाः पीडित बालकांना लवकर न्याय मिळावा आणि त्यांची ओळख गुप्त राहावी यासाठी विशेष जलदगती न्यायालयांची तरतूद करण्यात आली आहे.

पालक आणि समाजाची जबाबदारीः सुसंवाद साधणे- पालकांनी मुलांशी मोकळेपणाने संवाद साधावा आणि त्यांच्या दैनंदिन अनुभवांबद्दल विश्वासाने विचारपूस करावी. सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्शः मुलांना लहान वयातच चांगला स्पर्श- Good Touch आणि वाईट स्पर्श- Bad Touch यातील फरक सोप्या भाषेत समजावून सांगावा. मदत क्रमांकः कोणत्याही बालकावर अत्याचार होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्वरित १०९८ (चाइल्डलाइन) या राष्ट्रीय हेल्पलाइन क्रमांकावर किंवा जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा. दररोज टीव्ही आणि पेपरला बातमी एकतरी दिसते, "अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून निर्घृण खून" यासाठीच आजचा जागतिक स्तरावर बाल लैंगिक शोषणाविरोधात जनजागृती करण्याचा दिवस; जागतिक स्तरावर असंख्य मुलांना लैंगिक शोषण, गैरवापर, हिंसाचार याचा जबरदस्त सामाना करावा लागतो. गेल्या काही काळात तर मुलांवरील अशा अत्याचाराच्या घटनांमध्ये मोठीच वाढ झालेली दिसून येते.

बाल लैंगिक शोषण ही एक जागतिक समस्या आहे, जिला कोणत्याही शारीरिक, आर्थिक, सामाजिक-आर्थिक, भौगोलिक, सांस्कृतिक किंवा लैंगिक सीमा लागू होत नाहीत. बाल लैंगिक शोषणाचे सर्व प्रकार हे मुलांच्या मानवाधिकारांचे गंभीर उल्लंघन असून कायद्यानुसार गुन्हा आहे आणि या गुन्ह्याचे परिणाम मुले, कुटुंबे आणि समाजावर दूरगामी असतात. संशोधनानुसार बाल लैंगिक शोषण म्हणजे प्रौढ आणि अल्पवयीन यांच्यातील किंवा दोन अल्पवयीनांमधील असे कोणतेही लैंगिक कृत्य, ज्यात एक जण दुसऱ्यावर सत्ता गाजवतो; तसेच एखाद्या मुलाला कोणत्याही प्रकारच्या लैंगिक कृत्यात सहभागी होण्यासाठी जबरदस्ती करणे, दबाव टाकणे किंवा पटवून देणे. यामध्ये शारीरिक स्पर्श न करता केल्या जाणाऱ्या कृत्यांचाही समावेश होतो, जसे की प्रदर्शनवाद, अश्लील साहित्याच्या संपर्कात येणे, परपीडेच्छा आणि फोन किंवा ऑनलाइनद्वारे लैंगिक स्वरूपाचा संवाद साधणे.

संयुक्त राष्ट्रांमधील मृत्युदंडावरील स्थगितीचा प्रस्ताव आणि भारताची भूमिका

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल वर्धा

आंतरराष्ट्रीय स्तरावर मानवाधिकारांच्या संकल्पना आणि विविध देशांचे राष्ट्रीय सार्वभौमत्व यांच्यात सातत्याने एक वैचारिक संघर्ष पाहायला मिळतो. याचाच एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे संयुक्त राष्ट्र महासभेत मृत्युदंडाच्या शिक्षेवर जागतिक स्तरावर स्थगिती आणण्यासाठी सातत्याने मांडला जाणारा ठराव. गुन्हेगारांना दिली जाणारी फाशीची शिक्षा पूर्णपणे रद्द करावी किंवा तिला तात्पुरती स्थगिती द्यावी, असा प्रवाह पाश्चिमात्य आणि काही युरोपीय देशांकडून वारंवार पुढे आणला जातो. मात्र, भारताने या प्रस्तावाच्या विरोधात मतदान करून आपली अत्यंत स्पष्ट, कायदेशीर आणि देशांतर्गत सार्वभौमत्वाला प्राधान्य देणारी भूमिका आंतरराष्ट्रीय पटलावर पुन्हा एकदा ठामपणे मांडली आहे.

भारताच्या या विरोधामागील सर्वात प्रमुख कारण म्हणजे देशाचे कायदेशीर सार्वभौमत्व होय. आंतरराष्ट्रीय मंचावर भारताने अत्यंत स्पष्ट शब्दांत हे निदर्शनास आणून दिले आहे की, प्रत्येक देशाला आपली न्यायव्यवस्था, कायदे आणि शिक्षेचे स्वरूप ठरवण्याचा अबाधित अधिकार आहे. मृत्युदंडाच्या शिक्षेबाबत जागतिक स्तरावर कोणतेही एकमत झालेले नाही. त्यामुळे, बाहेरून असा कोणताही ठराव लादणे म्हणजे सदस्य देशांच्या वैधानिक अधिकारांमध्ये आणि अंतर्गत न्याय प्रक्रियेत थेट हस्तक्षेप करण्यासारखे आहे. भारतासारख्या लोकशाही देशात कायदे हे संसदेत प्रदीर्घ चर्चेनंतर आणि देशाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थितीचा विचार करून बनवले जातात, त्यामुळे अशा बाह्य दबावाला बळी न पडणे हे राष्ट्रीय हिताचे मानले जाते.

भारतीय न्यायव्यवस्थेमध्ये मृत्युदंडाची शिक्षा ही सरसकट किंवा क्षुल्लक कारणांसाठी दिली जात नाही, हा मुद्दा भारताने प्रकर्षाने मांडला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या प्रस्थापित तत्त्वांनुसार, केवळ 'दुर्मिळातील दुर्मिळ' प्रकरणांमध्येच ही अंतिम शिक्षा सुनावली जाते. जेव्हा एखादा गुन्हा अत्यंत क्रूर, अमानुष आणि संपूर्ण समाजाच्या सदसद्विवेकबुद्धीला हादरवून सोडणारा असतो, तेव्हाच न्यायालय फाशीची शिक्षा सुनावते. त्यामुळे ही शिक्षा म्हणजे मानवाधिकारांचे उल्लंघन नसून, समाजातील न्याय आणि कायद्याचा वचक टिकवून ठेवण्यासाठी उचललेले एक अत्यंत आवश्यक पाऊल आहे.

न्यूयॉर्क येथील संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात नुकतीच १३ नोव्हेंबर २०२६ रोजी या प्रस्तावावर मतदानाची महत्त्वपूर्ण घटना पार पडली. या मतदानाच्या वेळी भारताने प्रस्तावात वापरण्यात आलेल्या शब्दावलीवर अत्यंत कडक आक्षेप नोंदवला. प्रस्तावामध्ये कायदेशीर प्रक्रियेतून दिल्या जाणाऱ्या मृत्युदंडाला 'राज्याकडून दिलेला मृत्यू' असे संबोधण्यात आले होते. भारताच्या मते, पारदर्शक न्यायालयीन प्रक्रियेतून, गुन्हेगाराला बचावाचे सर्व कायदेशीर अधिकार दिल्यानंतर आणि पुराव्यांची सखोल छाननी केल्यानंतर दिल्या जाणाऱ्या शिक्षेची अशा प्रकारे निंदा करणे, हे संपूर्ण न्यायव्यवस्थेचेच मोठे विडंबन आहे.

भारताची ही भूमिका आंतरराष्ट्रीय पातळीवर एकाकी नाही. या ठरावाला विरोध करणारा भारत हा एकमेव देश नसून, अमेरिका, चीन, जपान, सौदी अरेबिया आणि सिंगापूर यांसारख्या अनेक प्रमुख देशांनीही या ठरावाच्या विरोधात मतदान करत आपल्या राष्ट्रीय न्यायव्यवस्थेचे समर्थन केले आहे.

जरी हा ठराव सदस्य देशांवर कायदेशीररित्या बंधनकारक नसला, तरी तो एक जागतिक दबाबगट निर्माण करण्यासाठी वापरला जातो. अशा परिस्थितीत, देशातील गुन्हेगारांवर कायद्याचा धाक राहावा, पीडितांना योग्य न्याय मिळावा आणि आपल्या स्वतंत्र न्यायव्यवस्थेचे अस्तित्व अबाधित राहावे, यासाठी भारताने घेतलेला हा निर्णय देशाच्या ठाम आणि स्वाभिमानी परराष्ट्र धोरणाचे उत्तम उदाहरण ठरतो.

- ९५६१५९४३०६

गोलंदाजांचे वर्चस्व, फलंदाजांचे पानिपत, भारताने वनडे मालिक जिंकली

डॉ.दत्ता विघावे क्रिकेट समिक्षक

भारताने न्यूझीलंडला २२ धावांनी पराभूत करून पाच सामन्यांची एकदिवसीय मालिका ३-१ ने जिंकली. यासह, भारताने न्यूझीलंडमध्ये सर्वाधिक एकदिवसीय सामने जिंकण्याचा पाकिस्तानचा विक्रम मोडला. भारताने या मालिकेत आणखी दोन मोठे विक्रम रचले. त्यांनी न्यूझीलंडची मायदेशात सलग ११ द्विपक्षीय एकदिवसीय मालिका जिंकण्याची मालिका खंडित केली आणि सात वर्षांनंतर त्यांना मायदेशातच पराभूत केले. गौतम गंभीरच्या प्रशिक्षणाखाली भारतीय संघाने परदेशात प्रथमच एकदिवसीय मालिका जिंकली.

मालिकेतील प्रमुख विक्रम आणि क्षण

भारताने न्यूझीलंडमध्ये १७ एकदिवसीय सामने जिंकले

भारताने आतापर्यंत न्यूझीलंडमध्ये १७ सामने जिंकले आहेत, तर पाकिस्तानने १५ सामने जिंकले आहेत. या यादीत ऑस्ट्रेलिया ३१ विजयांसह आघाडीवर आहे.

भारताने सात वर्षांनंतर न्यूझीलंडमध्ये मालिका जिंकली

भारताने न्यूझीलंडमध्ये शेवटची एकदिवसीय मालिका २०१९ मध्ये जिंकली होती. संघाने पाच सामन्यांची मालिका ४-१ ने जिंकली होती. त्यानंतर भारताला २०२० मध्ये ३-० आणि २०२२ मध्ये १-० ने पराभव पत्करावा लागला.

गंभीरच्या प्रशिक्षणाखाली पहिला परदेशी एकदिवसीय मालिका विजय

गौतम गंभीरची ९ जुलै २०२४ रोजी भारताच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती झाली. त्याच्या प्रशिक्षणाखाली भारताचा हा पहिला परदेशी एकदिवसीय मालिका विजय आहे. न्यूझीलंड दौऱ्यापूर्वी, भारताने गंभीरच्या प्रशिक्षणाखाली तीन परदेशी द्विपक्षीय एकदिवसीय मालिका खेळल्या होत्या. संघ तिन्ही मालिका हरला. श्रेयस अय्यरने कर्णधार म्हणून आपला पहिला एकदिवसीय सामना जिंकला. मागील सामना हा त्याचा एकदिवसीय कर्णधार म्हणून पदार्पणाचा सामना होता. हा सामना भारताच्या एकदिवसीय इतिहासातील दुसऱ्या सर्वात मोठ्या पराभवात संपला. भारतीय संघ २४४ धावांनी हरला.

कोहली आणि रोहित सचिनचा विक्रम मोडू शकले नाहीत

न्यूझीलंडमध्ये एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा भारतीय विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे. सचिनने २२ सामन्यांमध्ये ८२१ धावा केल्या आहेत. विराट कोहली १८ सामन्यांमध्ये ६८२ धावांसह दुसऱ्या स्थानावर आहे. तो सचिनचा विक्रम मोडण्यापासून १३९ धावांनी दूर राहिला. रोहित शर्मा १९ सामन्यांमध्ये केवळ ४६७ धावाच करू शकला. भारतासाठी सर्वाधिक २० वेळा शून्यावर बाद होण्याचा विक्रम कोहलीच्या नावावर आहे. एकदिवसीय सामन्यांमध्ये भारतासाठी सर्वाधिक वेळा शून्यावर बाद होण्याच्या विक्रमात विराट कोहली आणि सचिन तेंडुलकर बरोबरीत आहेत. दोघेही प्रत्येकी २० वेळा शून्यावर बाद झाले आहेत. अकराव्या क्रमांकावर फलंदाजी करताना अर्शदीप सिंगचे २ षटकार, व्यंकटेश प्रसाद आणि शमी यांच्या विक्रमाची बरोबरी.

अर्शदीप सिंगने भारताच्या डावाच्या शेवटच्या षटकांमध्ये ४ चेंडूंमध्ये १४ धावा केल्या. त्याने २ षटकार मारले. यामुळे एकदिवसीय सामन्यांमध्ये एका डावात सर्वाधिक षटकार मारणाऱ्या भारतीय ११ व्या क्रमांकाच्या फलंदाजांच्या यादीत तो संयुक्तपणे पहिल्या स्थानावर आहे. या विक्रमात त्याने व्यंकटेश प्रसाद आणि मोहम्मद शमी यांची बरोबरी केली आहे.

परदेशात भारताच्या मधल्या फळीची सरासरी २४.६४

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ पासून, भारताच्या ४ ते ७ क्रमांकाच्या फलंदाजांनी देशांतर्गत आणि परदेशी सामन्यांमध्ये वेगवेगळी कामगिरी केली आहे. या फलंदाजांची देशांतर्गत सामन्यांमधील सरासरी ४७.७५ आहे, तर परदेशात ही सरासरी २४.६४ पर्यंत घसरली आहे.

सामन्यातील टॉप ४ क्षण

कोहलीने डीन फॉक्सक्रॉफ्टचा झेल सोडला. न्यूझीलंडच्या डावाच्या १९व्या षटकात, विराट कोहलीने सेकंड स्लिपमध्ये डीन फॉक्सक्रॉफ्टचा झेल सोडला. अर्शदीप सिंगच्या चेंडूवर फॉक्सक्रॉफ्टच्या बॅटची बाहेरील कड लागली. चेंडू कोहलीकडे आला, पण तो दोन्ही हातांनी तो पकडू शकला नाही. कोहलीने सेकंड स्लिपमध्ये झेल सोडला.

यश ठाकूरऐवजी कोहलीने सीमारेषेवर क्षेत्ररक्षण केले

यश ठाकूरऐवजी विराट कोहली स्वतः सीमारेषेवर गेला. यानंतर प्रेक्षकांचे लक्ष कोहलीकडे वळले. तो सीमारेषेच्या ज्या बाजूला क्षेत्ररक्षणासाठी जात होता, तिथे स्टँडमधील प्रेक्षकही त्याचा पाठलाग करत होते. हा कोहली आणि रोहितचा न्यूझीलंडमधील शेवटचा सामना असू शकतो.

यश ठाकूरने पदार्पणाच्या सामन्यात पहिली एकदिवसीय विकेट घेतली

यश ठाकूरने या सामन्यात एकदिवसीय पदार्पण केले. त्याला अक्षर पटेलने पदार्पणाची संधी दिली. यशने डीन फॉक्सक्रॉफ्टला बाद करून आपली पहिली एकदिवसीय विकेट घेतली. त्याने १० षटकांत ३८ धावा देऊन १ बळी घेतला. यश ठाकूरला अक्षर पटेलने पदार्पणाची कॅप दिली.

अक्षरने टिकनरला यष्टीचीत केले

अक्षर पटेलने ४९ व्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर ब्लेअर टिकनरला यष्टीचीत केले. इशान किशनने यष्टीमागे असलेल्या बेल्स पटकन काढल्या. न्यूझीलंडचा संघ १८७ धावांवर सर्वबाद झाला आणि भारताने हा सामना २२ धावांनी जिंकला.

या मालिकेत दोन्ही संघांच्या गोलंदाजांनी धारदार मारा करून फलंदाजांवर वर्चस्व टिकवले. या मालिकेतील एकमेव शतक किवी फलंदाज विल यंगच्या बॅटमधून निघाले. तर भारताकडून एकमेव अर्धशतक विराट कोहलीने ठोकले. त्याच्या चार सामन्यातील ८६ धावा या भारतीय फलंदाजात सर्वाधिक ठरल्या तर रोहित शर्मा चार सामन्यात केवळ ३० धावाच करू शकला. अक्षर पटेल ७६ धावांसह दुसऱ्या क्रमांकावर राहिला. तर गोलंदाजीत भारताच्या गुरनूर बार ३ सामन्यात ९ बळी मिळवून आघाडीवर राहिला त्यामुळेच तर त्याला मालिका विराचा किताब मिळाला. भारताने चारही सामन्यात न्यूझीलंडला सर्वबाद करण्याचा पराक्रम केला. त्यामुळेच मालिका ३ -१ अशी जिंकता आली.

- ९०९६३७२०८२

पत्रकारिता देश व समाज घडविण्याचे मोठे माध्यम

रमेश लाजेवार नागपूर

आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात पत्रकारितेला मोठे महत्व आहे.त्यामुळे पत्रकारितेला "चौथास्तंभ" ही उपमा दिली आहे.जागतीक हालचाली, कळत-नकळत घटना,राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय, जिल्हास्तरीय, गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत संपूर्ण हालचाली किंवा माहिती १४५ कोटी जनतेपर्यंत पोहचवीण्याचे काम पत्रकारितेच्या किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून होत असते.१६ नोव्हेंबर १९६६ ला प्रेस काउन्सिल ऑफ इंडियाने राष्ट्रीय पत्रकारितेच्या निमित्ताने एक कार्यक्रम घेतला व यामध्ये ठरविण्यात आले की दरवर्षी १६ नोव्हेंबर हा दिवस राष्ट्रीय पत्रकारिता दिवस म्हणून साजरा करण्यात येईल.तेव्हापासून प्रत्येक वर्षी १६ नोव्हेंबरला राष्ट्रीय पत्रकारिता दिवस म्हणून साजरा केल्या जातो.

१९२० मध्ये लेखक वाल्टर लिपमैन आणि एक अमेरिकी दर्शनिक जॉन डेवी यांनी लोकतांत्रिक समाजामध्ये पत्रकारितेच्या भुमिकेवर विचार विमर्श प्रकाशित केले होते. पत्रकारिता,जनता आणि नितीनिमार्ते यांच्यातील मध्यस्थीतीची भुमिका हाताळीत असते.तेव्हाच आपल्याला समतोलता दिसून येते.या समतोलतेचे दायीत्व पुर्णपणे पत्रकारितेवर अवलंबून असते व पत्रकार आपली जबाबदारी मोठ्या शितापीने आणि खंबीरपणे पार पाडतो.

प्रत्येकबाब जनतेच्या हितासाठी असावी या उद्देशाने प्रत्येक गोष्ट जनतेच्या हितार्थ प्रकाशित केल्या जाते.पत्रकारितेचे अनेक तत्व आहेत लिखाण, समाजातील घडामोडींवर नजर ठेवून माहीती एकत्र करने व ती पत्रकारितेच्या माध्यमातून समाजापर्यंत, सरकारपर्यंत व प्रशासनापर्यंत

पोहचवीने.आजच्या आधुनिक युगात वर्तमानपत्र, रेडिओ, दूरदर्शन, वेब-पत्रकारिता, ई-पेपर,सोशल मिडिया यांच्या माध्यमातून पत्रकारिता केल्या जाते.

माध्यमातून पत्रकारितेची भुमिका मोठ्या प्रमाणात बजावली जाते.परंतु काही वाहीण्या स्वतःच्या स्वार्थासाठी कार्य करतात. यामुळे पत्रकारितेची बदनामी होतांना सुध्दा आपण उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे.परंतु पत्रकारिता तीच असते ज्यामुळे समाजाची जडणघडण मजबूत होते व देशाचा पाया मजबूत होतो यालाच म्हणतात "चौथास्तंभ". पत्रकारिता साधी शैली नसुन कोणत्याही घटनेचा लिखित रूपात वर्णन करण्याकरिता अनेक शैलींचा सटीकतेने उपयोग केल्या जातो यालाच म्हणतात "पत्रकारितेची शैली". पत्रकारितेचे अनेक प्रकार आहेत एम्बुश पत्रकारिता, सेलिब्रिटी पत्रकारिता, कन्वर्जेंस पत्रकारिता,गोंजो पत्रकारिता, खोजी पत्रकारिता, नवीन पत्रकारिता, विज्ञान पत्रकारिता, खेळ पत्रकारिता इत्यादी अनेक पत्रकारितेचे प्रकार आपल्याला पहायला मिळतात. पत्रकारांमध्ये नेहमी निष्पक्षता दिसून येते त्यामुळे समाजात खंबीरपणे उभे राहून आपल्या लेखणीच्या माध्यमातून धारधार लीखाण केल्या जाते. यातुनच समाजाला दीशा-निर्देश समजुन येतात.पत्रकारितेच्या लेखणीत एवढी धार असते की तलवारीची धार त्यासमोर नगण्य दिसून येते.कारण संपूर्ण समाजाच्या नैतिकतेची जबाबदारी पत्रकारांच्या लेखणीतून निर्माण होत असते. आज पत्रकारितेच्या माध्यमातून स्थल, जल, वायु यातील घडामोडी जनतेला कळुन येतात.

आज मिडियाच्या माध्यमातून व वृत्तपत्र समूहाच्या माध्यमातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी सर्वांना पहायला मिळते.या घडामोडी समाजापर्यंत पोहचविण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.ज्याप्रमाणे सुरंग खोदुन खनीज संपत्ती शोधल्या जाते.त्याचप्रमाने पत्रकारिता व लेखक आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्याकरिता एडीचोटीचे प्रयत्न करीत असतो म्हणजेच ऊन,पाऊस, थंडी, सुनामी, खडतडवाट, युद्धजन्य परिस्थितीतील ठिकाणांचा विचार न करता माहिती गोळा करतो व समाजापर्यंत पोहचवितो. तेव्हाच देशातील प्रत्येक व्यक्ती सकाळी वर्तमानपत्राची आतुरतेने वाट पाहत असतो. वर्तमानपत्राला सकाळचा नाश्ता सुध्दा म्हणतात. यावरून स्पष्ट होते की पत्रकारिता व लेखक यांच्यामुळे समाजाची जडणघडण होण्यास मोठी मदत मीळत असते. आज पत्रकारिता कोहीनुरच्या हीऱ्यापेक्षाही जास्त मौल्यवान आहे. आज एका लेखणीतून लाखो-अरबो शब्द बाहेर पडतात म्हणजेच पत्रकारिता ही समुद्रापेक्षाही अफाट आणि मौल्यवान असल्याचे दिसून येते.

यातुनच जगात मोलाचा संदेश जात असतो. लेखणीमध्ये व पत्रकारितेमध्ये एवढे तालमेल आहे की संपूर्ण जग लेखणीच्या माध्यमातून पत्रकारितेवर मोठ्या प्रमाणात विश्वास ठेवतो.माही भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी "दर्पण" नावाचे पहिले मराठी दैनिक सुरू केले होते. १८३२ साली सुरू करण्यात आलेले बाळशास्त्री जांभेकरांचे "दर्पण" हे मराठीतील पहिले वृत्तपत्र होय.यानंतर राजा राममोहन रॉय यांचा "संवाद कौमुदी"टिळक-आगरकरांचा 'मराठा' व 'केसरी' गणेश शंकर विद्यार्थी यांचा 'प्रताप' ही सर्व वृत्तपत्रे आर्थीक तोटा सहन करून समाज जागृत करण्यासाठी चालविलेल्या जात होती.परंतु आता देशात काही राजकीय पक्षांची वृत्तपत्रेसुध्दा दिसून येतात हि वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या आणि दुर्दशन वाहीण्या पत्रकारितेला कलंकित करण्याचे काम करीत असतात.याला केंद्र व राज्य सरकारने कोठेतरी रोखले पाहिजे.आपल्या पुर्वजांनी ज्याप्रमाणे पत्रकारितेची जोपासना केली त्याचप्रमाणे पत्रकारितेची जोपासना सरकार मार्फत व प्रशासनामार्फत व्हायला पाहिजे आणि पत्रकारिता व चौथास्तंभ याला कोणताही आघात पोचनार नाही याची जबाबदारी राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने घेतली पाहिजे.

टिआरपी वाढावी म्हणुन काही वाहीण्यांनी पत्रकारितेची व चौथास्तंभ याची पायमल्ली करण्याचा प्रयत्न केला होता परंतु तो सरकारने हाणुन पाडला. १६ नोव्हेंबर राष्ट्रीय पत्रकारिता दिवसांच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की पत्रकारिता व चौथास्तंभ याला कुठल्याही प्रकारची क्षती होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेण्याची गरज आहे. देशात कुठल्याही परिस्थितीत पत्रकारितेचे व्यवसायीकरण होवु नये व राजकीय दृष्टया कोसो दूर राहुन पत्रकारिता आणखी बळकट केली पाहिजे.कारण पत्रकारिता ही प्रसारमाध्यमांचे काम करीत असते यातुनच समाजाला दीशा निर्देश मिळत असते.

पत्रकारिता ही वटवृक्षासारखी अफाट आहे कारण समाजातील घटना ऊन,पाउस, थंडी यासारख्या बदलत असतात यापासून संरक्षण करण्याचे काम पत्रकारिता नेहमी करीत असते. पत्रकार आपल्या जिवाची पर्वा न करता आकाश-पाताळ एक करून निर्भीडपणे कार्य करीत असतो.परंतु गेल्या काही वर्षांपासून असामाजिक तत्वांकडुन पत्रकारांवर हल्ले होत असतांनाचे दिसून येते ही अत्यंत गंभीर व निषेधजनक बाब आहे. अशा असामाजिक तत्वांना प्रशासनाने, केंद्र व राज्य सरकारांनी कोठेतरी रोखले पाहिजे व कठोर कारवाई केली पाहिजे. १६ नोव्हेंबर राष्ट्रीय पत्रकारिता दिवसाला शत-शत प्रणाम करतो.जय हिंद!

- ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

६९ वी महाराष्ट्र केसरी २०२६-२७ चा मान यंदा नागपूरला!

नागपुरात रंगणार कुस्तीचा भव्य महासंग्राम!, ४२ शहर व जिल्हा संघांचा सहभाग; १,३०० मल्लांसह सुमारे १,७०० जणांची उपस्थिती अपेक्षित

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्रातील कुस्ती क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठेची आणि मानाची समजली जाणारी वरिष्ठ गट राज्यस्तरीय गादी व माती अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा तसेच 'महाराष्ट्र केसरी' किताबासाठीची लढत सन २०२६-२७ मध्ये नागपूर येथे आयोजित करण्यात येणार आहे. नागपूर महानगरपालिकेला ७५ वर्ष पूर्ण झाली असून या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विदर्भातील तसेच महाराष्ट्रातील कुस्ती खेळाडूंना प्रोत्साहन आणि संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ, नागपूर शहर जिल्हा कुस्तीगीर संघ आणि नागपूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २० ते २४ जानेवारी २०२७ दरम्यान सरदार वल्लभभाई पटेल (कच्छी विसा) मैदान येथे केले जाणार आहे. अशी माहिती सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष माजी आमदार श्री. संदीपजी जोशी यांनी या स्पर्धेचे आयोजन नागपूर येथे करण्याबाबत महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाकडे विनंती केली होती. त्यानुसार संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर झालेल्या ठरावानुसार नागपूर येथे स्पर्धा आयोजित करण्यास अधिकृत मान्यता देण्यात आली आहे.



या स्पर्धेसाठी महापौर निता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, विरोधीपक्ष नेते संजय महाकाळकर मनपा आयुक्त डॉ. विपीन, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम, क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे उपायुक्त मंगेश खवले, तसेच इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले आहे.

महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे राज्यातील महत्त्व

महाराष्ट्र केसरी स्पर्धेला राज्याच्या कुस्ती क्षेत्रात अनन्यसाधारण महत्त्व असून, हा किताब महाराष्ट्रातील मल्लांसाठी अत्यंत प्रतिष्ठेचा आणि मानाचा समजला जातो. राज्यातील विविध जिल्ह्यांतील नामांकित मल्ल या स्पर्धेत सहभागी होऊन आपले कुस्ती कौशल्य, सामर्थ्य आणि गुणवत्ता पणाला लावणार आहेत. गादी व माती या दोन्ही प्रकारांतील वरिष्ठ गटाच्या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धा पार पडणार असून, महाराष्ट्र केसरी किताबासाठी होणाऱ्या अंतिम लढतीकडे संपूर्ण महाराष्ट्रातील कुस्तीप्रेमींचे लक्ष लागलेले असेल. या स्पर्धेच्या माध्यमातून राज्यातील गुणवंत कुस्तीपटूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी प्रतिष्ठेचे राज्यस्तरीय व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

४२ शहर व जिल्हा संघांचा सहभाग; १३०० मल्लांचा समावेश!

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाशी संलग्न असलेल्या राज्यातील एकूण ४२ शहर व जिल्हा कुस्तीगीर संघांचा या स्पर्धेत सहभाग राहणार आहे. प्रत्येक शहर व जिल्हा संघातून गादी प्रकारातील १० वजनगटांमध्ये प्रत्येकी एक खेळाडू आणि माती प्रकारातील १० वजनगटांमध्ये प्रत्येकी एक खेळाडू, असे एकूण २० खेळाडू सहभागी होणार आहेत. त्यानुसार ४२ संघांमधून गादी प्रकारात आणि माती प्रकारात असे एकूण १३०० खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

याशिवाय प्रत्येक संघासोबत दोन मार्गदर्शक आणि एक संघ व्यवस्थापक असे एकूण १२६ मार्गदर्शक व व्यवस्थापक उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेच्या नियोजनासाठी प्रथम श्रेणी अंतरराष्ट्रीय कुस्ती पंच प्रा. दिनेश गुंड स्पर्धा प्रमुख म्हणून तसेच १२५ तांत्रिक अधिकारी व २५ पदाधिकारी तसेच अनेक नामांकित मल्ल सहभागी होणार आहेत.

या सर्व आकडेवारीनुसार खेळाडू, मार्गदर्शक, व्यवस्थापक, पंच व पदाधिकारी मिळून अंदाजे १७०० जणांची उपस्थिती अपेक्षित आहे. त्यामुळे नागपूर येथे कुस्तीचा भव्य राज्यस्तरीय क्रीडा महोत्सव अनुभवायला मिळणार आहे.

संभाव्य विजेते

महाराष्ट्र केसरीचे प्रबळ दावेदार म्हणून मागील महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीर व पृथ्वीराज मोहोळ तर उप महाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाड, प्रकाश बनकर, जय पाटील, सिकंदर शेख व विराज चव्हाण असे नामांकित कुस्तीगीर या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

भव्य आयोजन आणि नियोजन

या स्पर्धेचे आयोजन भव्य, शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने करण्याचा मानस असून, राज्यातील सर्व संलग्न शहर व जिल्हा कुस्तीगीर संघ, आयोजक संस्था आणि संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून स्पर्धेचे नियोजन करण्यात येणार आहे. सहभागी खेळाडू, मार्गदर्शक, व्यवस्थापक, पंच आणि पदाधिकाऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विशेष नियोजन करण्यात येणार आहे.

विदर्भाच्या कुस्ती क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण पर्व

विदर्भाला कुस्तीची समृद्ध परंपरा लाभली असून, महाराष्ट्र केसरीसारख्या प्रतिष्ठेच्या स्पर्धेचे आयोजन नागपूर येथे होणे ही संपूर्ण विदर्भासाठी अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून नामांकित मल्ल नागपूर येथे दाखल होणार असल्याने नागपूर शहर कुस्तीमय होणार आहे. या स्पर्धेमुळे विदर्भातील कुस्तीला नवी ऊर्जा, प्रोत्साहन आणि व्यापक व्यासपीठ मिळण्यास मदत होणार असून, स्थानिक क्रीडा क्षेत्रालाही मोठी चालना मिळणार आहे. नागपूर शहरातील कुस्तीपटूंनी, शहरातील आणि विदर्भातील विविध क्रीडा संस्थांच्या खेळाडूंनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग घेण्याचे आवाहन यावेळी मनपा तर्फे करण्यात आले आहे.

थोडक्यात

शारदामाते यंदा हिवाळा व उन्हाळा ऋतूत अवकाळी पावसाच्या सरी कोसळू दे : संकेत झाडे



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू :मौदा

चाचेर-निमखेडा जि प सर्कल अंतर्गत येणाऱ्या येसंबा येथे शारदा उत्सव सुरू असून, उत्सव सुरू असलेल्या सभामंडपाला सर्कलचे भाजपाचे भावी जि. प चे उमेदवार संकेत झाडे सह मान्यवरांनी भेट दिली. यंदा मौदा तालुक्यासह ,जिल्ह्यात व राज्यात कोरड्या दुष्काळामुळे शेतकरी व सामान्य नागरिकांना पाण्याची तीव्र टंचाई भासणार आहे. पाणीटंचाईची झळ सौम्य स्वरूपात राहण्यासाठी हिवाळ्यात व उन्हाळ्यात अवकाळी पावसाच्या सरी कोसळण्याची मागणी याप्रसंगी संकेत झाडे यांनी शारदेमातेला केली आहे.

याप्रसंगी खंडाळा (गांगोर) सरपंच, गांगोर आरोग्य उपकेंद्र आरोग्य सभापती, भाजपा किसान आघाडी जिल्हा महामंत्री व जिल्हा परिषदचे भाजपाचे भावी उमेदवार संकेत झाडे, माजी पं स मौदा उपसभापती व जिल्हा परिषद चे भाजपाचे भावी उमेदवार खेमराज चाफले, येसंबा उपसरपंच धनराज हारोडे, पोलीस पाटील नरेंद्र राऊत,मंगेश चाफले, हिरा चकोले सह ग्रामस्थ उपस्थित होते.

अल्पवयीन मुलीला फूस लावून इंदूरला नेले; भिवापूर पोलिसांनी आरोपीला ठोकल्या बेड्या


दोन दिवसांची पोलीस कोठडी

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

शेजारी राहणाऱ्या १५ वर्षे ६ महिन्यांच्या अल्पवयीन मुलीशी जवळीक साधून तिला फूस लावून पळवून नेल्याचा गंभीर प्रकार येथील दिघोरा येथे उघडकीस आला आहे. मुलीला थेट मध्य प्रदेशातील इंदूर येथे घेऊन जाणाऱ्या अनुज रामराव सावसाकडे (वय ३४) याला भिवापूर पोलिसांनी अटक केली आहे. तब्बल तीन आठवड्यानंतर पोलिसांनी मुलीचा शोध घेत तिला ताब्यात घेतले. आरोपीला न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अनुज सावसाकडे हा दिघोरा येथे पीडित मुलीच्या घराजवळच राहत होता. त्याचे मुलीशी फोनवर तसेच घराजवळ भेटल्यावर बोलणे होत असल्याचे तिच्या आईच्या निदर्शनास आले होते. दरम्यान, २४ ऑक्टोबर रोजी दुपारी आरोपीच्या पत्नीने मुलीच्या आईकडे येऊन आपल्या पतीला मुलीसोबत पुन्हा बोलताना पाहिल्याचे सांगितले. त्यानंतर दोघीही शोध घेण्यासाठी गेल्या असता मुलगी तेथे आढळली नाही. नातेवाईक आणि गावात शोध घेऊनही ती मिळून न आल्याने आरोपीने तिला फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करीत आईने भिवापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या प्रकरणी पोलिसांनी सुरुवातीला अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. अखेर १६ नोव्हेंबर रोजी पोलिसांनी पीडित मुलीचा शोध घेऊन तिला ताब्यात घेतले. तपासादरम्यान आरोपी तिला इंदूर येथे घेऊन गेल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन भारतीय न्याय संहिता २०२३ आणि पोक्सो कायद्यातील गंभीर कलमांची वाढ करण्यात आली. १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता आरोपी अनुज सावसाकडे याला अटक करण्यात आली. अल्पवयीन मुलीशी संबंधित गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यात पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या असून पुढील तपास सुरू आहे. ठाणेदार अजितसिंग देवरे यांच्या मार्गदर्शनात प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सचिन उरकुडे करीत आहेत.

सिरसोलीच्या प्रफुल निमकर यांची शिक्षकपदी निवड, वाचनालयाच्यावतीने सत्कार



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले वाचनालय, सिरसोली यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. पवित्र पोर्टलमार्फत झालेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत सिरसोली येथील प्रफुल निमकर यांची शिक्षकपदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही वाचनालयाच्या वतीने पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

प्रफुल निमकर यांच्या या यशामुळे सिरसोली गावाच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या यशाचे उपस्थितांनी कौतुक केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन करावे, यासाठी अशा सत्कार समारंभातून प्रेरणा मिळते. या कार्यक्रमाला वाचनालयातील वाचकवर्ग तसेच सुमित भुते, राहुल निमकर, जुमदेव वंजारी, विलास निमकर, अनिकेत भुते, अतिश निमकर, संकेत जगणित, ललित निमकर, लोकेश निमकर, सामाजिक कार्यकर्ते राजकुमार मदनकर, पोलीस पाटील पायल निमकर, दिपाली वंजारी, सुहासिनी तुमसरे यांच्यासह पालकवर्ग उपस्थित होता. प्रफुल निमकर यांच्या निवडीबद्दल सर्व उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सन्मार्ग नगरात श्री हनुमान मंदिरात आजपासून संगीतमय श्रीमद भागवत कथेचे आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सन्मार्ग नगर क्र. १ हुडकेश्वर रोड नागपूर येथील, श्री हनुमान मंदिर देवस्थान येथे परमपूज्य जगदंबा माता व श्री हनुमान महाराज यांच्या कृपेने बुधवार दि. १८ नोव्हेंबर ते मंगळवार २४ नोव्हेंबर पर्यंत, संगीतमय श्रीमद् देवी भागवत कथा व ज्ञानयज्ञ सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या सात दिवसीय धार्मिक सोहळ्यांमध्ये भागवताचार्य तथा वेदांताचार्य हभप तीरथ उपाख्य दादा महाराज पु. बाराहाते (उज्जैन) नागपूर यांच्या रसाळ वाणीतून श्रीमद् देवी भागवत कथेचे निरूपण करण्यात येणार आहे. या सप्ताहाच्या माध्यमातून जगदंबा मातेची महती, देवीचे विविध अवतार, भक्ती, ज्ञान, धर्म, संस्कार, अध्यात्मिक, जीवन मूल्यांचा संदेश, भाविकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या २७७ प्रकरणांची नोंद, उपद्रव शोध पथकाची कारवाई

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. ८ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर दरम्यान उपद्रव शोध पथकाने २७७ प्रकरणांची नोंद करून १ लाख १३ हजार ३०० रुपयाचा दंड वसूल केला.

सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी /उघड्यावर मलमूत्र विर्सजित करणे या अंतर्गत ८ प्रकरणाची नोंद करून ४००० रूपायाची वसुली करण्यात आली. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४०० दंड) या अंतर्गत ११९ प्रकरणांची नोंद करून ४७६०० रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत ३ प्रकरणाची नोंद करून ३०० रूपायाची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत २४ प्रकरणाची नोंद करून ९६०० रूपायाची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डिंगचे हॉटेल, सिनेमाहॉल, मंगल कार्यालये, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता, फुटपाथ,मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत १२ प्रकरणाची नोंद करून २४००० रूपयाची वसुली करण्यात आली.

न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर; भिवापुरात कामकाज ठप्प

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर



उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे समान वेतन लागू करण्याच्या मागणीसाठी राज्यातील सुमारे ३४ हजार दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप पुकारला आहे. या आंदोलनात भिवापूर दिवाणी व फौजदारी न्यायालयातील सर्व कर्मचारी सहभागी झाल्याने न्यायालयीन कामकाज पूर्णतः ठप्प झाले आहे.

न्यायालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी काम बंद केल्याने न्यायालयात केवळ न्यायाधीश कुमारी युक्ता कडू यांची उपस्थिती होती. कर्मचारी संपावर गेल्यामुळे सुनावणीसह दैनंदिन प्रशासकीय कामकाजावरही परिणाम झाला आहे. त्यामुळे विविध प्रकरणांच्या सुनावणीसाठी आलेले पक्षकार आणि वकील यांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांनाही समान वेतनाचा लाभ मिळावा, ही आंदोलनकर्त्यांची प्रमुख मागणी आहे. या मागणीवर अद्याप निर्णय न झाल्याने नागपूर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेच्या नेतृत्वाखाली हा संप सुरू करण्यात आला आहे.

भिवापूर न्यायालयाचे प्रभारी अधीक्षक पी. पी. बोरकर, वरिष्ठ लिपिक बी. डब्ल्यू. मेश्राम, लघुलेखक के. एस. कठाणे, कनिष्ठ लिपिक जी. एम. खेमस्कर, डी. डी. शेंडे, एस. एस. बोरकर, ए. एम. गोहने, एम. एम. बागडे यांच्यासह एस. जी. गावंडे, पी. बी. गभने, सी. डी. मुसळे आणि ए. ए. वाघमारे हे कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत.

कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपामुळे न्यायालयीन प्रक्रियांना खीळ बसली असून, प्रलंबित प्रकरणांच्या सुनावणीवरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. संपावर तोडगा कधी निघणार आणि न्यायालयीन कामकाज पूर्ववत कधी होणार, याकडे पक्षकारांचे लक्ष लागले आहे.

राज्यातील ३४ हजार कर्मचारी आंदोलनात सहभागी; न्यायाधीशांची एकट्याची उपस्थिती, पक्षकारांची गैरसोय

बल्लारपूरात ६२४ किलो प्रतिबंधित एचटीबीटी कापूस बियाणे जप्त : १७.४८ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांढरे

शेतकऱ्यांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने प्रतिबंधित एचटीबीटी कापूस बियाण्याची अवैध वाहतूक होत असल्याचा गंभीर प्रकार बल्लारपूर येथे उघडकीस आला आहे. कृषी विभागाच्या भरारी पथकाने बामणी-राजुरा मार्गावरील सीमापुरी ट्रान्सपोर्टसमोर छापा टाकून ६२४ किलो संशयित एचटीबीटी कापूस बियाणे आणि वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे वाहन असा एकूण १७ लाख ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आंध्र प्रदेशातील कर्नूल येथील वाहनचालक राजू रामडू बाशापोषु (४५) याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली.

१४ नोव्हेंबर रोजी बल्लारपूर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील



कृषी अधिकारी (गुण नियंत्रण) तथा बियाणे निरीक्षक पल्लवी संपत गोडबोले यांनी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास बामणी-राजुरा मार्गावरील सीमापुरी ट्रान्सपोर्टसमोर एपी ३९ टीजी २१२७ क्रमांकाच्या वाहनाची पंचांसमक्ष तपासणी केली.

यावेळी वाहनात खाकी रंगाची १४ पोती आढळून आली. पोत्यांची तपासणी केली असता त्यामध्ये संशयित प्रतिबंधित एचटीबीटी हायब्रीड कापूस बियाणे असल्याचे निदर्शनास आले.

वाहनचालक राजू बाशापोषु याच्याकडे बियाण्याच्या वाहतुकीसंदर्भातील बिल्टी, वाहतूक पावती आणि डिलिव्हरी चलनाची मागणी केली असता त्याच्याकडे कोणतीही कागदपत्रे आढळून आली नाहीत. चौकशीदरम्यान त्याने कर्नूल येथील धनलक्ष्मी सीडचे सीताराम साहेब यांच्या सांगण्यावरून बामणी परिसरात वाहन उभे केले होते. त्यानंतर तीन व्यक्तींनी टेम्पोतून आणलेली १४ पोती आपल्या वाहनात भरून घटनास्थळी वाहन उभे करण्यास सांगितल्याची माहिती दिली.

कृषी विभागाच्या पथकाने संशय बळावल्याने एका पोत्यातील बियाण्याची तपासणी केली. यावेळी ते संशयित एचटीबीटी हायब्रीड कापूस बियाणे असल्याचे आढळले. जिल्हा गुणनियंत्रक निरीक्षक श्रावण बोधे यांच्या उपस्थितीत पंचनामा करून १४ पोत्यांतील एकूण ६२४ किलो बियाणे जप्त करण्यात आले. प्रतिकिलो दोन हजार रुपये याप्रमाणे बियाण्याची किंमत १२ लाख ४८ हजार रुपये असून, वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या वाहनाची अंदाजे किंमत पाच लाख रुपये आहे. असा एकूण १७ लाख ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त बियाण्यांमधून दोन किलो नमुना घेऊन तो सीलबंद करण्यात आला असून, प्रयोगशाळेतील तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे.

जप्त करण्यात आलेल्या बियाण्यांच्या पोत्यांवर उत्पादकाचे नाव व पत्ता, लॉट क्रमांक, लेबल क्रमांक, तपासणी दिनांक, पॅकिंग दिनांक, जेनेटिक इंजिनिअरिंग अप्रूव्हल कमिटीची मान्यता आणि विक्रीदार यांसारखी आवश्यक माहिती नमूद नसल्याचे आढळून आले. तसेच बियाण्याच्या साठवणुकीसाठी, वाहतुकीसाठी आणि विक्रीसाठी आवश्यक कागदपत्रेही उपलब्ध नव्हती. त्यामुळे बियाणे अधिनियम १९६६, बियाणे नियम १९६८, महाराष्ट्र कापूस बियाणे पुरवठा, वितरण व विक्रीच्या किमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन अधिनियम २००९ तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे कृषी विभागाने नमूद केले आहे.

ही कारवाई जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार व जिल्हा कृषी विकास अधिकारी वीरेंद्र राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम अधिकारी लोकेश कात्रे, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण अधिकारी श्रावण बोधे, तालुका कृषी अधिकारी अजय पवार आणि कृषी अधिकारी (गुण नियंत्रण) पल्लवी संपत गोडबोले यांनी केले.

थोडक्यात

दत्तक जागरूकता महिन्यानिमित्त नागपुरात भव्य बालमहोत्सव उत्साहात संपन्न

बालहक्क, बालसंरक्षण आणि दत्तक प्रक्रियेबाबत मान्यवरांचे मार्गदर्शन; १५० हून अधिक बालकांचा सहभाग



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दत्तक जागरूकता महिन्यानिमित्त (१ ते ३० नोव्हेंबर) पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त १४ नोव्हेंबर रोजी, बालदिनाचे औचित्य साधून पंचवटी नगर, इंट्राभट्टी चौक येथे न्यू एनर्जी बहुउद्देशीय संस्थेद्वारे संचालित राष्ट्रीय दत्तक ग्रहण शिशुगृहाच्या वतीने भव्य बालमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. वावेळी बालकल्याण समितीच्या अध्यक्षा छाया राऊत यांनी बालहक्क व बालसंरक्षणाबाबत मार्गदर्शन केले. समितीच्या सदस्या विजया साहू, विनायक नंदेश्वर तसेच जिल्हा बालसंरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण यांनी बालकांच्या हक्क, समस्या व गरजांवर प्रकाश टाकला. साधना हटवार यांनी दत्तक प्रक्रिया, मिशन वात्सल्य आणि CARA नियमांची माहिती दिली. संस्थेच्या अधीक्षिका पूजा झोडे यांनी २००५ पासून संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध बालकल्याण योजनांची माहिती दिली.

विशेष दत्तक योजनेअंतर्गत आतापर्यंत १२५ बालकांना देशांतर्गत, तर १० बालकांना परदेशात नियमानुसार दत्तक देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेचे सचिव सनमकुमार गोंडाणे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. उपाध्यक्षा चंदा गोंडाणे यांनी मान्यवरांचा सत्कार केला, तर अध्यक्ष सी.के.गोंडाणे यांनी आभार मानले. नितीन विंचूरकर यांच्या संगीत कार्यक्रमाने बालमहोत्सवात रंगत आणली. कार्यक्रमाला १५० हून अधिक बालके आणि १०० महिला-पुरुष उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेच्या पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

माळी समाजाचा राज्यस्तरीय वर-वधू परिचय मेळावा उत्साहात संपन्न

विवाहोत्सुक युवक-युवतींना मिळाले योग्य स्थळ शोधण्यासाठी व्यासपीठ



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

अखिल भारतीय माळी महासंघ, नागपूर आणि क्रांतिज्योती माळी विकास संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (१५ नोव्हेंबर) गीता मंदिर येथे राज्यस्तरीय माळी समाजाचा वर-वधू व पालक परिचय मेळावा उत्साहात पार पडला. मेळाव्याला समाजबांधव आणि पालकांचा मोठा प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे उद्घाटन अखिल भारतीय माळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सत्यशोधक शंकरराव लिंगे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी महासंघाचे विश्वस्त गोविंद वैराळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार कृष्णाजी खोपडे, माजी आमदार अशोक मानकर, ओबीसी महामंडळाचे अध्यक्ष अविनाश ठाकरे, अरुण पवार, दीपक देशमुख, गौतम क्षीरसागर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या मेळाव्याचे विशेष आकर्षण म्हणजे विवाहयोग्य युवक-युवतींनी व्यासपीठावर येऊन स्वतःचा परिचय करून दिला. त्यामुळे विवाह इच्छुकांना तसेच त्यांच्या पालकांना योग्य स्थळांची माहिती घेण्याची व परस्पर संवाद साधण्याची संधी मिळाली.कार्यक्रमाचे संचालन गायत्री भुसारी, दीपलीताई भेदे आणि डॉ. संगीताताई उमाळे यांनी केले. मेळाव्याच्या यशस्वितेसाठी शिवराम गुरुनुले, डॉ. विवेक भुसारी, नामदेवराव लांजेवार यांच्यासह महासंघाचे पदाधिकारी, महिला आघाडी आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. आभार प्रदर्शन शिवराम गुरुनुले यांनी केले.समाजातील विवाहयोग्य युवक- युवतींना योग्य जीवनसाथी निवडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि सामाजिक एकोपा दृढ करणे हा मेळाव्याचा मुख्य उद्देश होता.

भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त खापरी येथे जनजातीय गौरव दिवस साजरा



दै. सिंहवाणी वृत्त, खापरी

भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे औचित्य साधून उमरेड तालुक्यातील खापरी येथे जनजातीय गौरव दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मेरा युवा भारत, नागपूर आणि शिवसाम्राज्य बहुउद्देशीय संस्था, उमरेड यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून करण्यात आली.

याप्रसंगी नागपूर जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त मोनिष अठूरकर, बिरसा, विनोद कोडापे, प्रल्हादजी मसराम, चंद्रशेखर मडावी, भारतजी नेवारे, मंगेश मडावी, रामाजी मंगाम, विक्की कुंभरे व गणेश काळसर्पे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तुषार तुमडाम, यश कुंभरे, करण मंगाम, हर्ष कुंभरे, संकेत मंगाम, दुर्गेश मंगाम, मिथुन मडावी, अर्जुन मंगाम, अमोल नेवारे, योगेश नेवारे, नंदू नेवारे, साहिल कोहळे, मयूर आत्राम, संदीप शेंद्रे, सतीश शेंद्रे, साहिल काळसर्पे, गणेश नेवारे, सौरभ चौधरी, सारंग चौधरी, सुजल काळसर्पे व अंशुल ठाकूर यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच संजू भाऊ क्रीडा मंडळाचे मोलाचे सहकार्य लाभले.

चंद्रपूरची अमरावतीवर मात, पटकावला 'अवादा विदर्भ व्हिजन कप'







दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

'अवादा विदर्भ व्हिजन कप इष्टिहीन क्रिकेट स्पर्धा - २०२६' मध्ये मंगळवारी चंद्रपूर व अमरावती संघात अंतिम सामना चांगलाच रंगला. वसंतनगर येथील मुजुमदार क्रिकेट अकादमीच्या मैदानावर झालेल्या या सामन्यात चंद्रपूर संघाने १० धावांनी अमरावती संघाचा पराभव करत 'व्हिजन कप' आपल्या नावावर केला.

अवादा फाउंडेशनफे असोसिएशन फॉर प्रमोशन ऑफ ब्लाइंड क्रिकेट इन विदर्भ आणि नागपूर येथील आत्मदीपम सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. अंतिम सामन्यात चंद्रपूर संघाने प्रथम फलंदाजी घेत २० षटकांमध्ये ९ गडी बाद १८२ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल अमरावती संघाला १९.२ षटकात सर्व बाद १७२ धावाच करता आल्या.

वावेळी झालेल्या पारितोषिक वितरण सोहळ्यात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते चंद्रपूर संघाचा कर्णधार गोकुल पारधी याने संघाच्या वतीने विजेतेपदाची ट्रॉफी स्वीकारली. गौरव झाडे याला 'बेस्ट ऑलराउंडर' पुरस्कारही देण्यात आला. त्याने प्रभावी गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणासोबतच धावांमधील उत्कृष्ट कामगिरी केली. तौफिक अलीने प्रभावी कामगिरी करत संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याला 'मॅन ऑफ द मॅच'चा किताब देण्यात आला.

या स्पर्धेत दृष्टिबाधित खेळाडूंसाठी बी-१, बी-२ आणि बी-३ अशा तीन श्रेणींमध्ये सामने खेळविण्यात आले. बी-१ श्रेणीतील खेळाडू पूर्णतः दृष्टिहीन असून, त्यांना केवळ आवाजाच्या आधारे खेळावर लक्ष केंद्रित करावे लागते. बी-२ श्रेणीतील खेळाडूंना अत्यल्प प्रकाशाची जाणीव होते, तर बी-३ श्रेणीतील खेळाडूंना त्यापेक्षा थोडी अधिक दृष्टी असते.

बी-३ श्रेणीत गौरव झाडे याने संपूर्ण मालिकेत २६५ धावा करत उत्कृष्ट कामगिरी केली. बी-२ श्रेणीत अमरावती संघाच्या अभिजीत घोबे याने ११४ धावा करत सहा बळी घेतले. बी-१ श्रेणीत अक्षय चौधरी याची उत्कृष्ट कामगिरी ठरली. या तिन्ही खेळाडूंना त्यांच्या श्रेणीतील 'मॅन ऑफ द सिरीज' पुरस्काराने गौरविण्यात आले.

निसर्ग दत्त फाउंडेशनच्या वतीने विशेष शतकी कामगिरीसाठी नागपूर संघातील योगेश घावट याला एक हजार रुपयांचे विशेष पारितोषिक देण्यात आले. स्पर्धेदरम्यान उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा तसेच विजेता व उपविजेता संघाचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

१४ वर्षीय मोहितला विशेष पुरस्कार

चंद्रपूर संघातील १४ वर्षीय मोहित याला विशेष पुरस्कार देण्यात आला. त्याने या स्पर्धेत दोन सामने खेळले. विशेष म्हणजे त्याचा पहिलाच सामना याच मैदानावर आणि याच स्पर्धेत झाला. त्याच्या सहभागाचे आणि कामगिरीचे कौतुक करत त्याला विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले.

पारितोषिक वितरण कार्यक्रमाला यांची होती उपस्थिती

पारितोषिक वितरण कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक रविंद्र भूसारी, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूरचे मेडिकल सुपरिटेंडेंट डॉ. अविनाश गावंडे, समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुलकर्णी, क्रिकेट ॲडमिनिस्ट्रेशन ॲंड डेव्हलपमेंट कमिटीचे चेअरमन प्रशांत वैद्य, अदाणी इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन ॲंड रिसर्चचे मेडिकल ॲंडव्हायझर डॉ. अनिरुद्ध चक्रवर्ती, अवाडा इलेक्ट्रोचे असिस्टंट व्हाइस प्रेसिडेंट मृदुल गहलोत, डॉ. सारिका कोमेरवर, अवाडा सीएसआर/अवाडा फाउंडेशनचे स्टेट हेड (महाराष्ट्र व गुजरात) दीपक कुमार जीना, माधव नेत्रालय, नागपूरचे ट्रस्टी संदीप धर्माधिकारी, अमर वासनीक, चंद्रपूर ब्लाइंड क्रिकेट संघाचे माजी कर्णधार, असोसिएशन व आत्मदीपम सोसायटीच्या अध्यक्ष जिज्ञासा चवलढाल, उपाध्यक्ष आकाश कुबडे, योगेश्वर चवलढाल आदींची उपस्थिती होती.

गौरव झाडे ठरला 'बेस्ट ऑलराउंडर'

रामटेकच्या ऋग्वेद बारोकरने साकारला पर्यावरणपूरक दिवाळी किल्ला

सात वर्षांपासून जपतोय छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांची परंपरा





दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

दिवाळी सणानिमित्त किल्ले तयार करण्याची महाराष्ट्राची ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरा आजही नव्या पिढीकडून जपली जात आहे. रामटेक येथील भगतसिंग वॉडार्तील १४ वर्षीय ऋग्वेद आनंद बारोकर याने यंदा आकर्षक असा काल्पनिक दिवाळी किल्ला साकारून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. ऋग्वेद गेल्या सात वर्षांपासून दिवाळीच्या निमित्ताने किल्ले तयार करीत असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची आणि महाराष्ट्राच्या ऐतिहासिक गडकिल्ल्यांची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा त्याचा प्रयत्न आहे.

यंदा त्याने साकारलेल्या किल्ल्यामध्ये दोन भव्य प्रवेशद्वारे, बुरुज, नगारा वादनासाठीचे नगरखाना, तलाव, शिवमंदिर तसेच स्वतःच्या हाताने तयार केलेली छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती अशा विविध वैशिष्ट्यांचा समावेश आहे.

विशेष म्हणजे, हा किल्ला तयार करण्यासाठी ऋग्वेदने माती, विटा, कौल आणि मडकी यांसारख्या पर्यावरणपूरक साहित्याचा वापर केला आहे. कल्पकता, मेहनत आणि ऐतिहासिक वारशाविषयीची आवड यातून त्याने किल्ल्याची सुंदर प्रतिकृती साकारली आहे. दिवाळी किल्ला ही केवळ मनोरंजनाची बाब नसून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, गड-किल्ल्यांचे महत्त्व आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा जतन करण्याचे प्रभावी माध्यम आहे, याची जाणीव ऋग्वेदच्या या उपक्रमातून दिसून येते. त्याच्या या कलात्मक उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

१७ नोव्हेंबरपासून न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

महाराष्ट्र राज्यातील दुय्यम न्यायालयांमध्ये कार्यरत असलेल्या न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे राज्य सरकार सातत्याने दुर्लक्ष करत असल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. वारंवार विनंत्या, चर्चा आणि निवेदने देऊनही मागण्या पूर्ण होत नसल्याने, अखेरीस महाराष्ट्र राज्य न्यायिक कर्मचारी १७ नोव्हेंबर २०२६ पासून बेमुदत संपावर गेलेले आहे. नागपूर जिल्हा न्यायालय कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मीकांत साखळकर यांनी पत्रकार परिषदेत या आंदोलनात सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सहभागाची माहिती दिली.

माननीय उच्च न्यायालयाने एक समिती गठीत केलेली होती त्या समितीने दुय्यम न्यायालयातील न्यायिक कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनवाढीच्या प्रस्ताव ३१ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्र शासनास मंजुरी करिता सादर केलेला आहे. पण, जवळपास दोन वर्षांचा कालावधी उलटला तरी शासनाने याबाबत कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही. केवळ वेतनश्रेणीच नव्हे, तर इतर मागण्याही अद्याप प्रलंबित आहेत. सरकार प्रश्नांना गांभीर्याने घेत नसल्याने न्यायालयीन कर्मचाऱ्यांमध्ये निराशा आणि तीव्र असंतोष वाढत असल्याचे न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी स्पष्ट केले.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या अनेक महत्त्वाच्या मागण्या २००६ पासून प्रलंबित आहेत, ज्यात प्रस्तावित वेतनवाढ, सुधारित वेतनश्रेणी, सेवाशर्ती, जुनी निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी, विविध वेतन आयोगांच्या शिफारशींची अंमलबजावणी आणि समान कामासाठी समान वेतन यांचा समावेश आहे. शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन या मागण्यांबाबत तात्काळ निर्णय घ्यावा, अशी संघटनेची मागणी आहे.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांना दैनंदिन कार्यालयीन काम करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. न्यायालयासारख्या संवेदनशील विभागाला व कर्मचाऱ्यांच्या समस्यांना शासन गांभीर्याने घेत नसल्याचे यावरून निदर्शनास येते

याप्रसंगी सावनेर वरिष्ठ स्तर व कनिष्ठ स्तर फौजदारी व दिवाणी न्यायालयाचे वानखेडे, अधीक्षक, भगत सहाय्यक अधीक्षक, पिपरेवार सहाय्यक अधीक्षक ,नागपुरे लघुलेखक, चिलबुले लघुलेखक सौ कडू, मॅडम लघुलेखक, काळे वरिष्ठ लिपिक ,रोकडे वरिष्ठ लिपिक, सोलंकी वरिष्ठ लिपिक राऊत मॅडम वरिष्ठ लिपिक, जुमडे प्रमुख बेलीफ, एस एस मुकादम कनिष्ठ लिपिक, पी एम सोनकुसळे कनिष्ठ लिपिक, सुरकार कनिष्ठ लिपिक, दैने बेलीफ, देशमुख, गजानन खराटे बेलीफ, हारगेवाड बेलीफ बर्डीकर, बेलीफ खोरगडे बेलीफ कु. नवगडे कनिष्ठ लिपिक कु. भुजाडे कनिष्ठ लिपिक,थेटे शिपाई, जाधव शिपाई, नकाशे सफाईगार आदिंनी बेमुदत संपात सहभाग घेत घोषणाबाजी केल्या.

दिवाळीच्या सुट्टीत शेताच्या मैदानावर रंगला क्रिकेटचा आनंद!



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दिवाळीच्या सुट्टीत नातेवाईकांकडे मुक्कामासाठी आले असताना देरडा येथील, शेतातील मोकळ्या मैदानावर क्रिकेट खेळण्याचा मनमुराद आनंद लुटला. ग्रामीण भागातील निसर्गरम्य वातावरणात क्रिकेट खेळताना जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. आज क्रिकेट हा खेळ किती लोकप्रिय झाला आहे, याची प्रचिती अशा छोट्या गावांतील मैदानांवरही पाहायला मिळते. शहर असो वा गाव, क्रिकेटची क्रेझ मात्र सर्वत्र सारखीच असल्याचे या क्षणातून दिसून आले. देरडा गावातील डॉक्टर मुरतकर परिवारातर्फे आयोजित कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्र आलेल्या नातेवाईकांनी क्रिकेटच्या मैदानावर आपापल्या खेळाची चुणूक दाखवली.

कुणी फलंदाजीचा आनंद घेतला, तर कुणी गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणाची जबाबदारी सांभाळली. चौकार- षटकारांची आतषबाजी, चेंडू पकडण्यासाठी होणारी धावपळ, खेळाडूंना प्रोत्साहन देणारे आवाज आणि प्रत्येक धावेवर व्यक्त होणारा जल्लोष यामुळे संपूर्ण मैदान उत्साहाने भारावून गेले होते. देरडा येथील मुरतकर परिवारातर्फे आयोजित कार्यक्रम करण्यात आला होता. खऱ्या अर्थाने शहरातील मोठ्या क्रीडांगणांची गरज नसते; खेळाची आवड, एकत्र येण्याची भावना आणि आनंद लुटण्याची तयारी असेल, तर शेतातील मोकळे मैदानही क्रिकेटचे सुंदर मैदान बनू शकते, याचा प्रत्यय देरडा येथे आला.

विकासाच्या प्रतीक्षेत सिरसीची स्मशानभूमी!

मोडकळीस आलेले शेड, असमतल जागा आणि मूलभूत सुविधांचा अभाव; लोकप्रतिनिधींच्या आश्वासनांचे काय झाले? नागरिकांचा संतप्त सवाल!



दै. सिंहवाणी वृत्त, सिरसी

गावातील नागरिकांच्या अत्यंत महत्त्वाच्या आणि संवेदनशील विषयांपैकी एक असलेल्या स्मशानभूमीच्या विकासाकडे मात्र अद्यापही दुर्लक्ष होत असल्याचे चित्र सिरसी येथे पाहायला मिळत आहे. गावातील स्मशानभूमी आजही विकासाच्या प्रतीक्षेत असून, येथील दुरवस्थेमुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

स्मशानभूमीवरील शेडची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. शेडचे पत्रे व इतर भाग तुटून मोडकळीस आले आहेत. तरीही त्याची अद्याप दुरुस्ती करण्यात आलेली नाही. स्मशानभूमी परिसराचे योग्य पद्धतीने सपाटीकरण (लेव्हलिंग) झालेले नाही. तसेच अंत्यविधीसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सोयी-सुविधांचाही अभाव जाणवत आहे.

निवडणुकीच्या काळात गावाच्या विकासाबाबत आणि स्मशानभूमीच्या कामाबाबत विविध आश्वासने दिली जातात. मात्र निवडणुका संपल्यानंतर या आश्वासनांचे काय होते, असा प्रश्न आता ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. नागरिकांच्या आयुष्यातील शेवटच्या प्रवासाशी निगडित असलेल्या या ठिकाणाची अशी दुरवस्था असणे ही निश्चितच चिंतेची बाब आहे.

स्मशानभूमीचा विकास हा कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा व्यक्तीचा विषय नसून तो गावाच्या मूलभूत गरजांचा आणि सामाजिक बांधिलकीचा विषय आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत प्रशासन आणि संबंधित यंत्रणेने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने विकासकामे हाती घेण्याची गरज आहे.

सिरसीच्या स्मशानभूमीचा विकास करणार तरी कोण?

मोडकळीस आलेल्या शेडची दुरुस्ती, परिसराचे सपाटीकरण, पाणी, प्रकाश व्यवस्था आणि आवश्यक सोयी-सुविधा कधी उपलब्ध होणार? की स्मशानभूमीचा विकास केवळ निवडणुकीपुरताच आश्वासनांचा विषय राहणार? असा सवाल आता सिरसीकरांकडून उपस्थित केला जात आहे. आता आश्वासने नकोत, प्रत्यक्ष विकासकामे हवीत, अशी अपेक्षा ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

थोडक्यात

'महाज्योती'चे काम नियमानुसारच

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

'महाज्योती'वर करण्यात आलेले आरोप पूर्णपणे निराधार आणि वस्तुस्थितीला धरून नाहीत. 'महाज्योती'चे कामकाज शासनाच्या नियम व मार्गदर्शक तत्त्वांनुसार पारदर्शकपणे सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन विविध प्रशिक्षण योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. बार्टी, सारथी, टीआरटीआय, वनार्टी आणि अमृत या सर्व संस्थांचे प्रशिक्षण सोबतच 'महाज्योती'चे प्रशिक्षण सुरू करण्यात येणार आहे. वस्तुस्थितीची खातरजमा केल्याशिवाय अशा प्रकारचे आरोप करणे योग्य नाही, असे महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, नागपूर (महाज्योती)चे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी सांगितले.

परिवहन समिती सभापतींसह कर्मचाऱ्यांनी केले रक्तदान

मनपाद्वारे वृक्षारोपण अन् रक्तदान शिबिरातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

पर्यावरण संवर्धनासह सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागातर्फे सोमवार (ता. १६) रोजी पीएमआय शहर बस डेपो, वाठोडा येथे वृक्षारोपण कार्यक्रम आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी परिवहन समिती सभापती मंगला खेकरे यांनी स्वतः रक्तदान करीत इतर कर्मचाऱ्यांना देखील रक्तदानासाठी प्रोत्साहित केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, नगरसेविका अर्चना पडोळे, मनपाचे प्रशासकीय अधिकारी योगेश लुंगे, परिवहन विभागाचे राजीव घाटोळे, चलो चमू,पीएमआय चमू तसेच महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम बस डेपो परिसरात मान्यवरांच्या हस्ते ३६ रोपांची लागवड करून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला. तसेच, यावेळी परिवहन समिती सभापती मंगला खेकरे यांनी स्वतः पुढाकार घेत रक्तदान करत इतरांना प्रोत्साहित केले. त्यांच्या या आवाहनात्मक कृतीला प्रतिसाद देत आयोजित रक्तदान शिबिरात परिवहन विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि बस चालकांनी मोठ्या संख्येने व उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत ४१ बॉटल्स रक्तदान केले.

मारवाडी राम मंदिरात भक्तिमय वातावरणात अन्नकूट व छप्पन भोग उत्सव



दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड

उमरेड शहरातील मारवाडी राम मंदिरात अन्नकूट व छप्पन भोग उत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त राजस्थानी महिला मंडळाच्या वतीने भगवान श्रीरामांसह देवतांना अर्पण करण्यासाठी विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांची आकर्षक छप्पन भोग सजावट करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी भक्तिमय वातावरणात भजनांचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर भगवानांना अन्नकूट प्रसादाचा नैवेद्य दाखवून विधिवत आरती करण्यात आली. आरतीनंतर उपस्थित समाजबंधूंनी श्रद्धेने अन्नकूट प्रसादाचा लाभ घेतला.

अन्नकूट व छप्पन भोगाची परंपरा ही केवळ धार्मिक विधी नसून भक्ती, कृतज्ञता आणि सामूहिक एकोप्याचे प्रतीक मानली जाते. परमेश्वराने दिलेल्या अन्नधान्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत समाजातील सर्वांनी एकत्र येऊन प्रसाद ग्रहण करणे, हा या उत्सवाचा मुख्य संदेश आहे. या माध्यमातून धार्मिक संस्कारांसोबतच समाजबंधू-भगिनींमध्ये प्रेम, बंधुभाव आणि एकतेची भावना दृढ होते. उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी दामोदरजी मुंधडा, गोपाल मुंधडा, गोविंद मुंधडा, नवनीत डागा, कमल किशोर सारडा, घनश्याम सारडा, संजय सारडा, ओमप्रकाश गांधी, डाऊ पाठक, सुरेश अग्रवाल, राधेश्याम अग्रवाल, गोपाल तापडिया, अनिल नत्थनी, चांदरतन नत्थनी यांच्यासह मारवाडी राम मंदिराचे सर्व सदस्य उपस्थित होते. यावेळी नागपूर जिल्हा महिला मंडळाच्या अध्यक्षा आशादेवी मुंधडा, उमरेड शहर महिला मंडळाच्या अध्यक्षा ज्योती सारडा यांच्यासह लता मुंधडा, शीतल मुंधडा, नीता मुंधडा, मंजू मुंधडा, मानसी सारडा, अमिता अग्रवाल, सुनीता अग्रवाल, अरुणा सारडा, संगीता सारडा, नंदा गांधी, सरला मुंधडा, मीना मुंधडा, कृष्णा मुंधडा, किरण मुंधडा, सुनीता मुंधडा, श्रीमती नत्थनी, सविता नत्थनी, मंगला मुंधडा, सुमिता डागा, रितू डागा, दीक्षा सारडा, मेघा सारडा, सीमा अग्रवाल यांच्यासह राजस्थानी महिला मंडळाच्या सर्व सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

आवश्यक तांत्रिक कामे व नियमित देखभाल व दुरुस्तीमुळे बुधवारी महाल विभागात वीज नाही

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : उपकेंद्रातील व्हीसीबीची देखभाल व दुरुस्ती, रिले बदलणे. नवीन एबी स्विच बसविणे, नवीन केबल चार्जिंग, ब्रेकरची देखभाल व दुरुस्ती व इतर नियमित देखभाल व दुरुस्तीच्या कामांसाठी बुधवार, दि. १८ नोव्हेंबर रोजी महावितरणच्या महाल विभागातील काही भागांचा वीज पुरवठा तात्पुरता खंडित राहील.

नगरधन येथे जुही शेरकर यांच्या मराठमोळ्या लावणीने रसिकांना घातली भुरळ!

दै.सिंहवाणी वृत्त, रामटेक

रामटेक तालुक्यातील पांडव पंचमी व मंडई उत्सवानिमित्त रामटेक तालुक्यातील नगरधन येथे उदयसिंग (गज्जु) यादव मित्र परिवार व युवा उद्योजक ग्रुप, नगरधन तर्फे दि. १६ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रातील प्रसिद्ध लावण्यवती व पाटलांचा बैलगाडा फेम जुही शेरकर (पुणे) यांच्या मराठमोळ्या लावणी नृत्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला नगरधनसह परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष उदयसिंग (गज्जु) यादव व माजी जी. प. सदस्य दुधराम सव्वालाखे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्रसिद्ध लावण्यवती जुही शेरकर यांनी आपल्या बहारदार नृत्यशैलीने आणि अदाकारीने उपस्थित प्रेक्षकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले.



मराठी व हिंदी चित्रपटांतील लोकप्रिय गीतांची एकापेक्षा एक सरस प्रस्तुती यावेळी करण्यात आली. विशेषतः 'पाटलांचा बैलगाडा', 'लैला मै लैला', 'या ड्राइवरला जीव थोडा लाव', 'खुळखुळा', 'कमाल झाली स्वप्नात आली' यांसारख्या गाण्यांवरील त्यांच्या दमदार नृत्याला प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात व उत्स्फूर्त प्रतिसादाने दाद दिली. त्यांच्या लावणीतील पारंपरिक ठसका, आकर्षक नृत्याविष्कार आणि सादरीकरणामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. मंडई उत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या सांस्कृतिक कार्यक्रमामुळे नगरधनच्या मंडई उत्सवात विशेष रंगत आली. दर्जेदार सांस्कृतिक मनोरंजनाची पर्वणी उपलब्ध करून दिल्याबद्दल आयोजकांचे उपस्थितांनी कौतुक केले.

यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष उदयसिंग (गज्जु) यादव, माजी जी. प. सदस्य दुधराम सव्वालाखे, भाजपचे जिल्हा महामंत्री राहुल किरपान, सरपंच माया दमाहे, उपसरपंच श्रीराम धोपटे, भाजपचे आदिवासी आघाडीचे प्रदेश सचिव सदाराम गाते, माजी उपसरपंच अरुण दमाहे, पिंटू नंदनवार, ग्रा.पं. सदस्य मोहित ईखार, भूषण नाटकर, कार्तिक धार्मिक, ऋषभ बावनकर, सुरजीतसिंग (बाबा) चिंटोले, मंगेश कामडी, विक्की साठवने, बंटी बंधाटे, होमेंद्र निखार, आनंद रामेलवार यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बाल-कुमार साहित्य संमेलन २३ व २४ नोव्हेंबरला, अभिनेत्री चिन्मयी सुमित यांची प्रकट मुलाखत

बालकवी संमेलन, कथावाचन आणि विविध चर्चासत्रांचे आयोजन


दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : बालकांच्या साहित्यिक, सांस्कृतिक आणि सर्जनशील कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासह त्यांच्या प्रश्नांवर चर्चा घडवून आणण्याच्या उद्देशाने स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ आणि बाल कला अकादमी व विदर्भ सांस्कृतिक परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने बाल-कुमार साहित्य संमेलनाचे आयोजन २३ व २४ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे. नंदनवन येथील महिला महाविद्यालयाच्या प्रांगणात होणाऱ्या या संमेलनात बालसाहित्य, कविता, कथावाचन, कलाविष्कार, बालसुरक्षा आणि आधुनिक जगातील मुलांचे प्रश्न अशा विविध विषयांवर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, २३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता संमेलनाचे उद्घाटन राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्य गीतांजली बुटी यांच्या हस्ते होईल. किशोर मासिकाचे कार्यकारी संपादक किरण केद्रे संमेलनाध्यक्ष म्हणून उपस्थित राहतील. बाल कला अकादमीच्या अध्यक्ष मधुरा गडकरी स्वागताध्यक्ष असतील. यावेळी सुप्रसिद्ध नाट्याभिनेत्री चिन्मयी सुमित यांची विशेष उपस्थिती राहणार असून ज्येष्ठ कवी आणि मुक्त चित्रकार प्रमोदकुमार अणेगाव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. यावेळी मुलांचे मासिकचे संस्थापक-संपादक जयंत मोडक यांचा सन्मान करण्यात येणार आहे. तसेच प्रसेनजित गायकवाड यांच्या काय तसे मी मरू? या बालकवितासंग्रहाचे आणि विशाल देवतळे यांच्या इवलसे सोनेरी कर्म या बालकादंबरीचे प्रकाशन होईल. दुपारी १२.४५ वाजता चिन्मयी सुमित यांची प्रकट मुलाखत कौमुदी साल्पेकर घेतील. त्यानंतर दुपारी १.१५ वाजता बालकवी आणि ज्येष्ठ कवींचे कविसंमेलन होईल. दुपारी २.१५ वाजता बालकथाकार आणि ज्येष्ठ कथाकारांचे कथावाचन होणार आहे. दुपारी ३.१५ वाजता आधुनिक जगात वयात येणाऱ्या मुलांचे प्रश्न आणि पालक या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. यात डॉ. नूतन देव, डॉ. जया शिवलकर आणि डॉ. संध्या पवार यांच्यासह बालक, पालक आणि शिक्षक सहभागी होतील. मंगळवार, २४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता बालकांच्या कलाविष्कारांचे सादरीकरण होणार असून त्यानंतर बालकांच्या सुरक्षा सजगतेवर आधारित पथनाट्य चाइल्ड हेल्पलाइन कार्यकर्ते आणि बाल संरक्षण विभागाच्या वतीने सादर करण्यात येईल. दुपारी १ वाजता बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न आणि पालक, समाज, शासकीय यंत्रणा यांच्या भूमिका या विषयावर चर्चासत्र होणार आहे. यात जिल्हा बाल कल्याण समितीच्या अध्यक्ष छायाताई राऊत, माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल दहीफळे, प्राथमिक शिक्षणाधिकारी निलेश गुंड, महिला व बाल विकास अधिकारी सुनील मेसरे, बाल संरक्षण अधिकारी मुश्ताक पठाण आणि प्रसेनजित गायकवाड सहभागी होतील.

'नांदी संमेलन' २२ नोव्हेंबरला, डॉ. अभय बंग यांच्या हस्ते उद्घाटन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

१०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे नियोजित आणि विदर्भ साहित्य संघ, नागपूर आयोजित 'नांदी संमेलन'चे रविवार, २२ नोव्हेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे. दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्र सभागृह, सिव्हिल लाइन्स येथे होणाऱ्या या संमेलनाचे उद्घाटन सकाळी १० वाजता 'सर्च' फाउंडेशन, गडचिरोलीचे संस्थापक डॉ. अभय बंग यांच्या हस्ते होणार आहे.

मराठी विद्यापीठ, रिद्धपूरचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर प्रमुख अतिथी राहणार असून दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्राच्या संचालक आस्था कार्लेकर अध्यक्षस्थानी



राहतील.

दुपारी १ वाजता संघभूमी आणि दीक्षाभूमी या विषयावर ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वि. स. जोग यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होईल. ज्येष्ठ विचारवंत डॉ. कुमार शास्त्री आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे विभागप्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे वक्ते म्हणून सहभागी होतील.

दुपारी २ वाजता जागतिक कीर्तीचे मानसोपचारतज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांची प्रकट मुलाखत आयोजित करण्यात आली आहे. ज्येष्ठ संपादक विकास झाडे आणि बाळ कुळकर्णी त्यांच्याशी संवाद साधतील. दुपारी ३ वाजता संमेलनाच्या समारोपीय विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष आणि यशवंतराव दाते स्मृती संस्थेचे अध्यक्ष प्रदीप दाते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांची प्रमुख उपस्थिती, तर विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी अध्यक्षस्थानी राहतील.

या संमेलनाला साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विदर्भ साहित्य संघातर्फे करण्यात आले आहे.

निवृत्तीवेतनधारकांसाठी २० नोव्हेंबरला नागपुरात महामेळावा

चेहरा प्रमाणीकरणाद्वारे डिजिटल हयात प्रमाणपत्र तयार करून मिळणार, आधार कार्ड, पीपीओ क्रमांक व बँक पासबुक आणण्याचे आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर राज्य शासकीय निवृत्ती वेतन धारक आणि कुटुंब निवृत्ती वेतन धारकांसाठी देशव्यापी डिजिटल जीवन प्रमाणपत्र अभियानांतर्गत चेहरा प्रमाणीकरण तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी २० नोव्हेंबर रोजी नागपुरात विशेष महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. वरिष्ठ कोषागार कार्यालय, जिल्हा अग्रणी बँक आणि नागपूर जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयीकृत बँकांच्या संयुक्त विद्यमाने हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

नियोजन भवन येथे सकाळी १०.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत हा महामेळावा होणार आहे. प्रधान सचिव (लेखा व कोषागार) डॉ. रिचा बागला, डीओपीपीडब्ल्यूचे निदेशक डॉ. प्रमोद कुमार आणि लेखा व कोषागारे विभागाच्या संचालक दीपा देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या महामेळाव्यात सहभागी होणाऱ्या निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्ती वेतन धारकांचे ऑनलाइन हयात प्रमाणपत्र (डिजिटल लाइफ सर्टिफिकेट) तयार करून देण्यात येणार आहे. चेहरा प्रमाणीकरणाच्या सुविधेद्वारे ही प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असून, याबाबत जिल्हा कोषागार कार्यालयाच्या वतीने मार्गदर्शन करण्यात येईल.

मेळाव्याचा लाभ घेण्यासाठी निवृत्तीवेतनधारकांनी आपले आधार कार्ड, पीपीओ क्रमांक, बँक खाते पुस्तिका (पासबुक) आणि मोबाईल सोबत आणणे आवश्यक आहे. शिबिरातच ऑनलाइन हयात प्रमाणपत्र तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. डिसेंबर २०२६ चे निवृत्तीवेतन अदा करण्यासाठी ऑनलाइन हयात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असल्याने सर्व पात्र निवृत्तीवेतनधारकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन वरिष्ठ कोषागार अधिकारी अमित मेश्राम यांनी केले आहे.

हिवाळी अधिवेशनासाठी ३४ पदांची भरती; २६ व २८ नोव्हेंबरला मुलाखती

लिपिक-टंकलेखक व शिपाई पदांसाठी उमेदवारांना मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन येत्या ७ डिसेंबरपासून नागपूर येथील विधान भवन येथे सुरू होत आहे. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर विविध कामांसाठी लिपिक-टंकलेखक आणि शिपाई/संदेशवाहक या पदांवर एकूण ३४ उमेदवारांची तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात येणार आहे. यामध्ये लिपिक-टंकलेखकाची १०, तर शिपाई/संदेशवाहकाची २४ पदे भरण्यात येणार आहेत. या पदांसाठी पात्र उमेदवारांच्या निवड प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. शिपाई/संदेशवाहक पदासाठी पात्र उमेदवारांची मौखिक चाचणी गुरुवार, २६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता विधान भवन, नागपूर येथे होणार आहे. तर लिपिक-टंकलेखक पदासाठी पात्र उमेदवारांची टंकलेखन चाचणी व मुलाखत शनिवार, २८ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे.

या दोन्ही पदासाठी अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांनी मुलाखतीकरीता विधानभवन, नागपूर येथे सर्व मूळ शैक्षणिक कागदपत्रासह उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पिकांचे उत्पादन घटले, भाव मिळूनही शेतकऱ्यांची चिंता कायम

सोयाबीन ७५८०, तर कापसाला ९२५० ते ९३३० रुपये भाव,आवकेत मोठी घट

दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड
मनिष शिंगणे

पावसाच्या लहरीपणाचा मोठा फटका यंदाच्या खरीप हंगामातील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे. कमी पावसामुळे पिकांचे उत्पादन घटल्याने शेतकऱ्यांच्या हातात अपेक्षित उत्पन्न आलेले नाही. उमरेड कृषी उत्पन्न बाजार समितीत मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर रोजी सोयाबीनला ७५८० रुपये प्रतिक्विंटल, तर कापसाला ९२५० ते ९३३० रुपये भाव मिळाला. भाव समाधानकारक असला तरी उत्पादनच कमी झाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी कायम आहे.



आज बाजार समितीत सोयाबीनची सुमारे १७०० क्विंटल आवक, तर कापसाची ३० गाड्यांची आवक झाली. बाजारात येणाऱ्या सोयाबीनची गुणवत्ता चांगली असल्याचे दिसून येत आहे. मात्र, उत्पादनाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटले आहे. चांगला भाव मिळत असल्याने शेतकरीही गरजेनुसारच सोयाबीन विक्रीसाठी बाजारात आणत असल्याचे चित्र आहे.

यंदा सोयाबीनच्या तुलनेत कापसाची लागवड अधिक झाली होती. मात्र, पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने कापसाच्या उत्पादनावरही मोठा परिणाम झाला. सोयाबीनच्या उत्पादनातही घट झाली आहे. पावसाच्या कमतरतेमुळे दोन्ही पिकांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम झाला असून, बाजारात आवकही लक्षणीयरीत्या कमी झाली आहे, अशी माहिती निलेश देशमुख यांनी दिली.

गतवर्षी नोव्हेंबर महिन्यात उमरेड कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनची सुमारे ५००० क्विंटल आवक, तर कापसाची सुमारे १५० गाड्यांची आवक नोंदविण्यात आली होती. त्या तुलनेत यंदाच्या आवकेत मोठी घट झाल्याचे स्पष्ट होते. बाजारभाव चांगला असला तरी शेतातच माल कमी झाल्याने वाढलेल्या भावाचा अपेक्षित फायदा शेतकऱ्यांना मिळत नसल्याची वस्तुस्थिती आहे.

उत्पादन घटल्याने शेतकरी आर्थिक संकटात

पावसाच्या लहरीपणामुळे खरीप हंगामातील उत्पादन घटले असून, शेतकऱ्यांचा लागवडीचा खर्चही भरून निघणे कठीण झाले आहे. त्यामुळे केवळ बाजारभावाकडे न पाहता उत्पादनातील घट आणि झालेल्या आर्थिक नुकसानीचा शासनाने गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी राजेश बालपांडे, कुंडलिक झोडे, सुधाकर घुमडे, शेतकरी वर्गातून होत आहे.

शेतकऱ्यांच्या हातून पीक गेले आहे; त्यामुळे शासनाने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रुपचंद कडू पाटील यांनी केली आहे. यंदाच्या हंगामात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असल्याने शासनाने तातडीने दखल घेऊन मदतीचा हात द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.